
# अमृत कुंभ



वर्ष १७ | अंक ३ | ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ | मूल्य रु. १४/-



शांतीवन, आबू रोड : ऐतिहासिक दिव्य अलौकिक समर्पण समारोह कार्यक्रमात उपस्थित राजयोगिनी ब्र.कु. रतनमोहिनी दादी, राजयोगिनी ब्र.कु. मुन्नी दीदी, राजयोगी ब्र.कु. निर्वेर, राजयोगी ब्र.कु. बृजमोहन व ४५० समर्पित बहिणी



नवी दिल्ली : माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. डॉ. लीना, ब्र.कु. डॉ. गंगाधर व ब्र.कु. दीपक



कणकवली : वाहतूक सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना ब्र.कु. RTO निरीक्षक भ्राता जितेंद्र पाटील, भ्राता डॉ. विद्याधर तायशेटे, ब्र.कु. शोभा, ब्र.कु. संध्या



वाशी (नवी मुंबई) : नवी मुंबई जैन संघातर्फे आयोजित कार्यक्रमात उपस्थित ब्र.कु. शीला व पू. श्री. सम्बोधिनी साध्वी, प.पू. श्री. हनीप्रिती साध्वी व अन्य



देऊळगाव राजा : मम्मांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमात उपस्थित ग्रुप फोटोत मुख्याध्यापक भ्राता देशमुख सर, भ्राता मोरे सर व ब्र.कु. सुनंदा



चंद्रपूर : आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त कार्यक्रमात औष्णिक वीज निर्मिती कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना ब्र.कु. कुंदा व ब्र.कु. शीतल



सटाणा : मातृदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना संबोधन करताना उज्वल कपडणीस, ब्र.कु. अंजूलता व ब्र.कु. सोनू

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १७, अंक ३. ऑगस्ट – सप्टेंबर २०२३




१. संपादकीय – प्रेमाच्या गावा जावे की न जावे? २
२. एक महान अलौकिक विभूति दादी प्रकाशमणी ४
३. परीकथा (भाग – १०) ५
४. मधुबनचा श्रृंगार–मोहिनी दीदीजी! ७
५. "शिवबाबा : माझा पाठीराखा" (भाग – ४) १०
६. चिंतन ११
७. व्यग्र कसे रहावे ? १२
८. रक्षाबंधनाचे भावनिक आणि आध्यात्मिक महत्त्व समजून सण साजरे करा १४
९. स्वानुभव १६
१०. प्रकाशवाटा (भाग – ५) १७
११. ट्रस्टी म्हणजे काय? १८
१२. पवित्र धन आणि अर्थव्यवस्था १९
१३. प्रश्नोत्तरे (भाग – ३) २१
१४. रजनीदीदींशी मनमोकळ्या गप्पा २२
१५. पसायदान (भाग – ३) २४
१६. कमकुवत संस्कारांचे परिवर्तन २५
१७ जगण्या शिकले (कविता) २६


## मुखपृष्ठाविषयी

दादी प्रकाशमणींना जो कोणी भेटला त्याने आध्यात्मिक तेजोवलयाचा अनुभव केला. आत्मिक प्रेमाचा अमोघ साठा त्यांच्याद्वारे प्रत्येकाने अनुभवला. संस्थेच्या दैनंदिन कार्यव्यवहारात प्रेम आणि शिस्तबद्धतेचे अप्रतिम संतुलन त्यांच्या कर्मांत नित्य बघायला मिळाले. 'अंतरी शुचित्व पूर्ण वसे ते बाह्य कर्मी स्वयं प्रकाशे' असे एकनाथ महाराजांनी वर्णन करून ठेवले आहे, ते दादीजींच्या व्यक्तिमत्त्वातून प्रत्ययास येत असे. त्यांची प्राणज्योत २५ ऑगस्ट २००७ या दिवशी मालवली; पण त्यांच्याविषयीचा स्नेहदीप मात्र ब्रह्माकुमारी संस्थेच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात आजही तेवत आहे. एखाद्या दिवंगत व्यक्तीची आठवण म्हणजे त्या व्यक्तीच्या गुणांचे स्मरण आणि ते गुण भरणाऱ्या सर्वशक्तिमान, गुणांच्या सागराचे अर्थात् परमेश्वराचे त्या निमित्ताने स्मरण हेच मुखपृष्ठात अभिप्रेत आहे. – प्रकाशिका


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : Info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.




संपादकीय ....

# प्रेमाच्या गावा जावे की न जावे?

एकदा दिल्लीहून अमृतसरला जाताना रेल्वे फलाटावर एक दृश्य बघावयास मिळाले. गाडीत बसलेल्या मंडळींना पोहोचविण्यास आलेल्या मंडळींचे चेहरे, एकमेकांचे घेतले जाणारे निरोप हे तसे नेहमीचेच दृश्य होते. गाडी हलली आणि त्या लोकांच्या डोळ्यांत पाणी तराळलेले बघायला मिळाले. अशाच प्रकारचे प्रसंग काही जाहिरातींमधून, चित्रपटांतून किंवा मालिकांतून दाखवले जातात. 'मनांत प्रेम' या विषयावर विचार घोळायला लागले. पुष्कळ वेळा असा निरोप घ्यायला जड जाते. सासरी जाणारी कन्या, निवृत्त होणारी माणसें आपण पाहतो; पण खऱ्या अर्थाने 'प्रेम' म्हणजे काय?

पाडगांवकर एका कवितेत म्हणतात, प्रेम म्हणजे प्रेम असतं तुमचं आमचं सेम असतं. सगळ्यांचं प्रेम एका प्रकारचे असू शकेल का? प्रेम ही भावना मनांत असेल; पण त्यामागचा भाव किंवा उद्दिष्ट निश्चितच वेगळे असू शकते. माणूस माणसावर प्रेम करतो, राणा प्रतापाचे आपल्या घोड्यावर प्रेम होते तसेच घोड्याचेही धन्यावर प्रेम होते. हत्तीही माणसाप्रमाणेच प्रेम करतो, माणसावरही प्रेम करतो हे एकदा डिस्कव्हरी वाहिनीवर दाखवले होते. एखादा हत्ती मेल्यावर कळपातले बाकीचे हत्ती त्याच्या शवाभोवती फेर धरून बसतात आणि रडतात. इतकेच नव्हे तर, कालांतराने पुन्हा त्याच जागी परत येऊन जणू शोक करतात किंवा श्रद्धांजली वाहतात. म्हणजे प्रेम ही एक भावना आहे आणि स्पर्श, अश्रू, शब्दांतला ओलावा इत्यादी प्रेमाची अभिव्यक्ती आहे.

साहित्य आणि चित्रपट ह्यांचा फार घनिष्ठ संबंध आहे आणि या दोन्ही क्षेत्रांत प्रेम हा विषय फार आवडीने हाताळला जातो.

साहित्याचे सर्व प्रकार आपल्याला प्रेमाच्या गावाला नेऊन आणतात. गझल असो, कविता असो, कादंबरी असो. चित्रपटांत तर खलनायकाची निर्मितीसुद्धा प्रेमातून झालेली बघायला मिळते. त्याला अँटी हिरो म्हणूनही रंगवलं जातं. बदलत्या काळानुसार प्रत्यक्ष जीवनांत एकतर्फी प्रेम व त्यातून उद्भवणारी गुंतागुंत हा एक नवा ताप झाला आहे. २९ जूनच्या लोकसत्तातील एक बातमी फारच भयानक होती. पुण्यातील सदाशिव पेठेत तरुणीवर कोयत्याने वार. एकतर्फी प्रेमाचा हा अतिरेकी प्रकार अजूनही अस्तित्वात आहे.

वर्तमानपत्रांत आपण एकतर्फी प्रेमाचे तापदायक प्रकार वाचतो, एखाद्या तरुणीवर हल्ला केला, ॲसिड फेकले वगैरे निंद्य प्रकाराबाबत वाचतो. खरंतर ह्या कृतीला प्रेमही म्हणता कामा नये. कारण ही विकृतीच आहे. खऱ्या प्रेमांत समर्पण सामावलेले असते, त्याग असतो. ज्याच्यावर प्रेम आहे त्याला जे आवडतं ते करण्यास उत्सुक असणं ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. इंग्रजीत म्हणतात 'यु कॅन गिव्ह विदाऊट लव्हींग, बट यु कान्ट लव्ह विदाऊट गिव्हींग.' आजपर्यंत जगांत जेवढे स्वातंत्र्यसैनिक, देशभक्त आदी होऊन गेले. त्यांनी देशाविषयीच्या प्रेमापुढे वैयक्तिक सुखं कस्पटासमान मानली.

पंधराव्या शतकांत इंग्लंडमधे असा अपसमज होता की प्रसूतीच्यावेळी स्त्रीला होणाऱ्या वेदना जितक्या अधिक, तितके तिचे अपत्यावरचे प्रेम अधिक टिकेल. सोसलेल्या वेदनांच्या प्रमाणात आईचे प्रेम वृद्धिंगत होते अशी समाजाची धारणा होती.

प्रेम करणारा माणूस ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्या कमतरता, उणिवा बघत नाही. त्या आपल्या उणिवा समजून भरून काढायचा प्रयत्न करतो. एखादी आई शाळेतल्या मुलाची अधोगती बघून स्वतः मेहनत घ्यायला सिद्ध होते. कुठल्याही नाते संबंधात हे दिसून येते, मग ते नवरा–

बायकोचे प्रेम असो, भावा-बहिणीचे असो किंवा मित्र-मैत्रिणींतले.

ह्याबाबत एक घटना आठवते- श्री. जयप्रकाश नारायणांनी चंबळच्या खोऱ्यांतल्या दरोडेखोरांना शस्त्र खाली ठेवायचे आवाहन केले. त्यानुसार अनेकांनी तसे केले हे विशेष. याला म्हणायचे प्रेमाद्वारे जिंकायचा प्रयत्न. प्रेमाची शक्ती माणसाचे आयुष्य बदलू शकते; पण बिघडवू शकतेदेखील. हे उदाहरण पहा. लहानपणी आपण एक गोष्ट ऐकली आहे - एका मुलाला लहान-सहान चोऱ्या करायची सवय लागते. पुढे तो अट्टल दरोडेखोर बनतो. त्याला देहदंडाची शिक्षा होते तेव्हा तो शेवटची इच्छा म्हणून आईला भेटतो त्यावेळी तिचा कान चावतो आणि म्हणतो 'तू मला वेळीच ओरडली असती तर माझ्यावर आज ही वेळ आली नसती'. म्हणजे इथे प्रेमाने नुकसान केले. नेहमी इंग्रजीत एक वाक्य वापरतात- 'एव्हरीथिंग इज फेअर इन वॉर अँड लव्ह.' पण ज्या प्रेमाने नुकसान आहे तिथे हे कसे लागू करणार. म्हणजे प्रेमांत सगळं काही माफ हा हिशेब कुठेतरी चुकतो. म्हणजे प्रेमांत प्रसंगी कठोर होणं ग्राह्य आहे, शिस्तबद्ध होणं व करणंही अपेक्षित आहे.

प्रेमातून दुःखही उत्पन्न होते. पहा कसे ते- प्रेम विफल झाले तर मनुष्य दुःखी होतो, प्रसंगी जीवघात करायलाही प्रवृत्त होतो. म्हणजे या प्रेमातून दुःख, कष्टही वाट्याला येऊ शकतात हे सत्य नाकारता येत नाही. अशी परिस्थिती कशी हाताळावी वगैरे चर्चा करण्याची इथे गरज नाही. तो विषय मानसशास्त्राचा असू शकेल. मुद्दा आहे प्रेमातून मिळणारे परिणाम काय काय असू शकतात.

स्वामी विवेकानंदांचे एक स्नेही जेव्हा वारले तेव्हा त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. सोबत असलेल्या संन्याशाने विचारले, तुमचाही बांध फुटावा हे आश्चर्य आहे! त्यावर स्वामीजी म्हणाले, संन्यासी असलो तरी मीही माणूसच आहे ना! एवढं खणखणीत वैराग्य असलेला अशा प्रसंगाने गलबलून जातो तिथे सामान्यांची काय तमा?

एवढी चर्चा केल्यावर वाटतं माणसाने माणसावर प्रेम करण्याला काही मर्यादा आहेत. अशा प्रेमामागून अपेक्षा येतात, त्या पूर्ण झाल्या नाहीत तर अपेक्षाभंगाचं दुःख येतं म्हणजे आपण निरपेक्ष प्रेम करू शकत नाही. मग प्रेम करावं की नाही? केलं, तर कुणावर करावं? व्यक्तींवर प्रेम करून आयुष्यभर सुखं वाट्याला आली तरी सर्व मर्त्य जीव एक ना एक दिवस आपल्याला सोडून जाणार किंवा आपण त्यांना सोडून जाणार म्हणजे अशा प्रेमाला असलेली दुःखाची झालर काही केल्या सुटत नाही हेच खरे.

मग चिरंतन प्रेम कसं प्राप्त करणार? शाश्वत प्रेमाचा स्रोत एकच तो म्हणजे परमेश्वर. त्याच्यावर प्रेम केल्यास फक्त प्रेमानेच परतफेड होते. त्याच्यावरच्या प्रेमातून सर्व प्राप्ती व शक्तींचं दान पदरी पडतं. याकरिता परमेश्वराचा सत्य परिचय आवश्यक आहे. जोपर्यंत यथार्थ परिचय नाही तोवर ईश्वर प्रेम अपूर्ण आहे. शिव पिता स्वतः येऊन आपल्याला आपला खरा परिचय देतो. आजवर आपण आत्मा आहोत हे जाणत होतो; पण त्याचा अभ्यास नव्हता. स्वतःला देह न समजता ज्योतिर्बिंदू आत्मा समजणे आवश्यक आहे. जोवर हा अभ्यास पक्का होत नाही तोवर सदैव देहातीत असणाऱ्या परमेश्वराशी खरं नातं जोडलं जात नाही. यामुळेच आपली एक तक्रार कायम राहते - माझं मन एकाग्र होत नाही. तसेच परमेश्वरकडे असलेल्या अक्षय गुण व शक्तींचा अनुभव होत नाही.

कलियुगाच्या परिवर्तनाच्या या काळात स्वतः शिव परमात्मा येऊन आपला परिचयच देऊन थांबत नाहीत तर आपल्याशी नातं जोडतात एका प्रेमळ पित्याचं, शिक्षकाचं आणि सद्गुरुंचही. नाते-संबंध प्रस्थापित झाल्यावरच प्रेम निर्माण होऊ शकते. बाळ जन्माला येतं तेव्हा हळूहळू मोठं झाल्यावर कळायला लागतं आणि इतरांशी स्नेहबंध जुळतो. असंच परमेश्वराशी स्नेहबंध जुळण्यासाठी त्या नात्याचा अनुभव घेणे गरजेचे आहे. शिव पित्याने ब्रह्माबाबांच्या द्वारे आपला सत्य परिचयही दिला आणि ज्ञानही दिले. त्याद्वारे संबंध जोडला. सत्कर्म म्हणजे काय, परमेश्वराच्या आठवणीत राहून कर्म कसे करायचे याची शिकवणही तो स्वतःच देतो. स्वतःला आत्मा समजून निराकाराची आठवण करणे हाच खरा राजयोग आहे तसेच तो प्रेमयोगही म्हणता येईल. खऱ्या किंवा शाश्वत प्रेमाच्या अनुभूतीचा हा सर्वोत्तम मार्ग आहे. यात विकारांना दग्ध करण्याची क्षमता आहे. म्हणूनच कबीर सांगून गेले 'प्रेम की गली अति सांकरी (अरुंद) तां में दो न समायी' म्हणजे प्रेमाची गल्ली अरुंद आहे त्यात मी आणि तो (परमेश्वर) दोघं जाऊ शकत नाहीत अर्थात 'मी'पण गळून पडल्याविना त्यातून पुढे जाता येत नाही. म्हणून परमेश्वरावर प्रेम करा आणि जगातल्या प्रेमाच्या

(पृष्ठ क्र.६ वर)



# एक महान अलौकिक विभूति दादी प्रकाशमणी

**ब्र.कु. छाया, मुलुंड (पूर्व)**

सृष्टिचक्राच्या इतिहासात संगम युगाचा काळ हा परमात्म अवतरणाचा काळ आहे, सृष्टि परिवर्तनाचा काळ आहे, अशा  महान काळात स्वतः परमपिता परमात्मा शिव यांनी रचलेल्या रुद्र ज्ञान यज्ञात ईश्वरी कार्याची मशाल हाती घेऊन विश्व परिवर्तनाचा झंडा ज्यांनी रुजवला, ज्यांच्या नावातच प्रकाश आहे त्या प्रकाशमणि दादी यांचा महिमा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही वैशिष्ट्यांविषयी मी आपणास सांगू इच्छिते.

**१. संपूर्ण समर्पण भाव :**

दादीजींनी ज्ञानयज्ञामध्ये प्रवेश करताच ब्रह्माबाबांप्रमाणेच सेवेमध्ये स्वतःला झोकून दिले. त्याग, तपस्या, सेवाभाव त्यांच्यात ठायीठायी भरला होता. त्यांच्या मुखातून 'मी' हा शब्द कधी आला नाही. त्या नेहमी म्हणत – कर्ताकरविता बाबा आहेत आणि दादी निमित्त आहे. 'मी' हा शब्द न वापरता 'दादी' हा शब्द उच्चारत असत. कोणतीही मोठी सेवा हाती घेण्याच्या अगोदर त्या ध्यानसंदेशी द्वारे बाबांशी सल्लामसलत करूनच बाबांच्या आज्ञेप्रमाणेच कार्य करत. त्या नेहमीच स्वतःला निमित्त अर्थात केवळ एक माध्यम समजत. ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मुख्य प्रशासिका असूनही त्यांच्यात 'मी' पणा नव्हता. दादीजी नेहमी कोणतेही कार्य समर्पण भावाने करत. 'मी' आणि 'माझे' या पासून त्या नेहमीच दूर राहिल्या. यज्ञवत्सांची कोणी निंदा केली तर, ते त्यांना आवडत नसे. बाबा ज्ञानमुरलीमध्ये जो इशारा देत तो आपल्या कार्यात 'त्या', प्राण पणाला लावून करत असत. मन, वचन, कर्माने प्रत्येकाला त्यांनी सर्वोत्तम संगोपन दिले.

**२. प्रत्येकाच्या विचारांना सन्मान देत :**

यज्ञामधील सेवा देणाऱ्यांपैकी कोणीही दोन व्यक्ति दादीकडे न्याय मागायला आल्या तर, त्या दोघांनाही संतुष्ट करत. त्या दोघांमध्ये एखादा विसंवाद असेल, तर त्या दोघांमध्ये मैत्रीभाव निर्माण करून देत. अशाप्रकारे त्यांनी ईश्वरी कार्याचे संघटन मजबूत बनवले.

**३. दुसऱ्याची समस्या स्वतःची समस्या समजत :**

दादीजींसमोर लहान मोठा असा दूजाभाव नसे. त्या मोठ्या प्रमाणे छोट्यांनाही सन्मान देत. यज्ञात एखादा सेवाधारी आजारी असेल तर, त्या स्वतः जातीने हजर राहत. त्यांची समस्या समजून घेत आणि त्यांना योग्य ते उपचार मिळेल याविषयी सर्व व्यवस्था लावून देत. असत. ती आजारी व्यक्ति ठीक होईपर्यंत त्या संपूर्ण लक्ष देत असत.

**४. प्रेम आणि शांती यांचे संतुलन दादीजींमध्ये होते :**

यज्ञातील एखाद्या सेवाधारीकडून एखादी चूक झाली आणि तो सेवाधारी दादीजींकडे माफी मागू लागला तर, दादीजी त्यांना प्रेमाने समजावून सांगत असत. पुढे कोणतीही चूक त्यांच्या हातून होऊ नये म्हणून आपल्या योगबळाचे सहकार्य करत. दादीजी कोणाशी कधीही आवाज चढवून बोलत नसत.

**५. नम्रतेची मूर्ती :**

एक दिवस यज्ञातील एक भाई वा एक कामगार यांच्यात काही कारणाने वादविवाद झाला. तेव्हा तो कामगार, यज्ञातील भावावरती ओरडाआरड करू लागला. त्यांचे हे रौद्र रूप पाहून दादीजींनी स्वतः उपस्थित राहून त्या कामगाराला समजवण्याचा प्रयत्न केला. यज्ञातील भावांच्या वतीने दादीजींनी स्वतः त्या कामगार भावाची हात जोडून माफी मागितली. दादीजींनी हात जोडताच तो कामगार भाऊ दादीजींसमोर नतमस्तक झाला आणि म्हणाला 'आप तो हमारी माँ हो' तुम्ही एवढ्या मोठ्या प्रशासिका असून आमच्या सारख्या साधारण कामगाराला महत्त्व दिले.

अशी महान विभूति नम्रतेच्या मूर्ती होत्या दादीजी.

(पृष्ठ क्र.९ वर)

# परीकथा

(भाग १०)

# पुरुषोत्तम संगम युग

ब्र.कु. रेखा, देगलूर



मागील काही भागात मी तुम्हाला परीची कथा सांगत आले आहे. आता पुढील भाग. आम्ही सर्वजण गावाहून परत आलो व राधाचे काका काकू मुंबईला परत गेले. राधा सकाळी लवकर उठली थोडावेळ अभ्यास करून, स्नान वगैरे करून समोरच्या काकूच्या घरी एक छोटासा टॉमी नावाचा कुत्रा होता त्याच्याशी खेळात होती. राधापेक्षा लहान त्या काकूची मुलगी होती. तिचं नाव 'नंदिनी'. राधा व नंदिनी खूप खेळल्या. शाळेची वेळ होत आली होती. राधा धावत घरी गेली. नंदिनी सुद्धा तयार होऊन आली. तेवढ्यात नंदिनीची आईसुद्धा आली होती. आम्ही दोघी बोलत असताना मी म्हणाले, "बसा ना अजून थोडा वेळ आहे." मी कॉफी करताना नंदिनीची आई लगेच म्हणाली, "यावर्षी पुरुषोत्तम मास येणार आहे. एखादी तीर्थयात्रा करावी असं आम्ही म्हणत आहोत नदीस्नानासाठी सुद्धा जायचं आहे." तेवढ्यात राधा व नंदिनी दोघीही जवळ आल्या. राधा, आई व काकूच्या सर्व गोष्टी ऐकत होती. राधा म्हणाली, "काकू तुम्ही आत्ता कोणता मास म्हणाला होता." काकू म्हणाल्या, "बाळा पुरुषोत्तम मास किंवा अधिक मास असेही म्हणतात." या महिन्यात सकाळी लवकर उठून गंगा स्नान करणे दानपुण्य करणे व आध्यात्मिक ज्ञान ऐकणे याला खूप महत्त्व आहे. अधिक मासात केलेले पुण्य दान अधिक होतं असं म्हणतात.

"काकू मला आता माझं स्वप्न आठवलं मला परी सुद्धा असचं काहीतरी सांगत होती. तुम्ही कोणता मास म्हणालात काकू?"

"बाळा मी अधिक मास किंवा पुरुषोत्तम मास याबद्दल बोलत होते आणि ही परी कोण ग!" काकूनी आश्चर्याने विचारले राधा गोड शब्दात म्हणाली, "काकू माझ्या स्वप्नात तीन ते चार दिवस झाले की एक परी येते. माझ्यासाठी काहीतरी नवीन रस किंवा खायला घेऊन येते." राधेने काकूला स्वप्नातल्या परीची गोष्ट थोडक्यात सांगितली यावर काकू म्हणाली, "राधा बाळ तुझ्या परीच्या गोष्टी तर खूप छान आहेत, आम्हाला सांगशील का?" राधा म्हणाली, "काकू कालसुद्धा परी माझ्या स्वप्नात आली होती. तिने माझ्यासाठी एका पानावर छोटे छोटे जांभळ्या रंगाचे फळ आणले होते ते खूप सुंदर आणि गोड होते. काल परीने माझा हात धरला व आम्ही दोघेही अलगद वर उडू लागलो मला खूप मज्जा वाटत होती. ती मला एका सुंदर बागेत घेऊन गेली. त्या बागेत चहूकडून सुगंध दरवळत होता, असं वाटत होतं की माझं स्वप्न कधी संपूच नये." काकू म्हणाली, "भारत भूमी फार पुण्याची भूमी, महान तीर्थ असे म्हणतात. भारतात पुरुषोत्तम महिन्यात जे पुण्यकर्म करतो ते वृद्धिंगत होते असं म्हणतात म्हणूनच सकाळी लवकर उठून गंगा स्नान करतात. ते फार पुण्यदायक समजतात."

"बाळ राधा दोन नद्या एकत्र मिळतात. त्याला संगम असं म्हणतात" तिथे गंगा स्नान केल्यामुळे पुण्य मिळते त्याप्रमाणे कलियुगाची समाप्ती व सत्ययुगाची सुरुवात त्यामध्ये जो काळ आहे त्याला 'पुरुषोत्तम संगमयुग' असं म्हणतात. परी सांगत होती जसे आपण गंगेत स्नान केल्यामुळे पावन बनतो, गंगास्नानामुळे पुण्य लाभते असे म्हणतात. परंतु गंगेच्या पाण्यामुळे फक्त शरीरावरील मळ वगैरे स्वच्छ होईल परंतु आत्म्यातील विकार किंवा मनांत असलेले क्रोध, लोभ, मोह, अहंकार इत्यादी नाश होत नाही. त्यासाठीच शिव परमात्मा संगमयुगात अवतरीत होतात. "जो पुरुषात उत्तम पुरुष तोच पुरुषोत्तम ज्ञान, पवित्रता, शांती, प्रेम इत्यादी गुणांद्वारे या सर्वांमध्ये जो उत्तम पुरुष तोच पुरुषांत उत्तम पुरुष. म्हणजेच शिव परमात्मा हा

पुरुषोत्तम बनविणारा आहे. सत्यधर्म तसेच उत्तम चारित्र्याची पुन्हा स्थापना करण्यासाठी या पुरुषोत्तम संगमयुगात परमात्म्याला येणे भाग पडते.'' मी परीला म्हणाले, ''परी या सर्व गोष्टी तर आम्हाला माहीतच नव्हत्या?'' परी हसत म्हणाली, ''शिव परमात्मा हा एका वृद्ध मनुष्याच्या शरीरात अवतरित होऊन त्याच्या मुखकमलाद्वारे ज्ञान देतात. ते प्रत्यक्षात आचरणारे स्त्री पुरुष म्हणजेच पवित्र ब्राह्मण अथवा शक्ती शिवशक्ती असं म्हटलं जातं'' या लहानशा युगाला, संगमयुग, धर्मयुग, पुरुषोत्तम युग, किंवा गीतायुग असेही म्हणतात. हे रहस्य माहीत नसल्यामुळे लोक गंगा नदीत स्नान करण्यास, दानधर्म करण्यास जातात. याद्वारे मनातील विकाराची धूळ जात नाही, त्यासाठीच शिव परमात्मा अवतरीत होऊन पुरुषोत्तम मासात काम क्रोधादीविकाराचे दान आपल्याकडून घेतात. दुर्गुणत्यागाचं शिक्षण देतात. या ज्ञाना द्वारे आपल्याला गुणवान व अत्यंत मर्यादाशील बनवतात. जो कोणी या ज्ञानगंगेत नित्य स्नान करेल, जो ज्ञान योगाद्वारे या शरीरापासून मन-बुद्धीने अलग होऊन खरी आध्यात्मिक यात्रा करेल तोच या नरकातून बाहेर पडून श्रेष्ठ चारित्र्यवान बनेल. खऱ्या रामराज्यात तो पोहचू शकेल. अशा रामराज्याची स्थापना शिव परमात्मा ब्रह्माद्वारे ज्ञान देऊन करतात. हेच रहस्य सत्य आहे. हे ऐकून सर्व दैवी गुण धारण करून सर्व जगाला आपण सांगायचं आहे की जगाच्या कल्याणार्थ शिव परमात्मा अवतरीत होऊन या कलियुगाचा नाश करून एक सत्यधर्माची स्थापना करीत आहेत. या पुरुषोत्तम युगात राजयोगाद्वारे मनावरील मळ धुतला जातो. गतजन्माची सर्व पापे दग्ध होतात. आपले संस्कार सत्वगुणी बनतात. हा अविनाशी रुद्र गीता ज्ञानयज्ञ १९३७ ला स्थापन झाला आहे. या प्रज्वलित केलेल्या ज्ञान व योगरूपी सूक्ष्म अग्नीत काम क्रोधादी विकार दग्ध करून नराचा श्री नारायण नारीची श्री लक्ष्मी अर्थात मनुष्यापासून देवता आपण बनू शकता. एवढी कथा सांगून परी थांबली मी म्हणाले, ''परी मला एवढं समजलं की गंगेच्या स्नान केल्यामुळे आपल्या मनावरील मळ किंवा आपल्या गतजन्माची पाप नष्ट होत नाहीत. तर या संगमात ज्ञान व राजयोगाच्या द्वारे ही सर्व पाप कर्म नष्ट होतात.''

परी मी तर ही सर्व गोष्ट सर्वांना सांगणार आहे बघ. ''माझं एवढं बोलणं संपलं की परी दिसेनाशी झाली.'' काकू म्हणाली, ''खरंच की राधा हे सर्व रहस्य आम्हाला माहीत नव्हतं. आम्ही सर्वजण आता गंगेच्या स्नानाऐवजी या ज्ञानगंगेतच डुबकी मारणार बघ.'' काकू पुढे म्हणाली, ''बाळ राधा, तू लहान असून सुद्धा आम्हाला किती छान गोष्ट लक्षात ठेवून सांगितलीस. तुझ्या परीच्या गोष्टी पण छान आहेत तू सुद्धा छान आहेस. तुम्ही शाळेत जा, मग आपण तुझ्या परीच्या इतर छान छान गोष्टी नंतर ऐकू.'' राधानेही मान डोलावली.

मी मात्र माझ्या कामात बाबांच्या आठवणीत मनातल्या मनात म्हणाले, ''माहीत नाही काय जादू असते. बाबांच्या छत्रछायेत दिव्य किरणात जितकं सखोल ज्ञानात जातो, जितकं बाबाचं ज्ञान आत्मसात करतो तितकं ते अधिक गहिरं वाटत जातं. ज्ञानगंगेत डुबकी मारल्यासारखं वाटतं. असं म्हणत बाबांच्या आठवणीत मी माझ्या कामाला लागले.

***

(पृष्ठ क्र.३ वरुन)

व्यापारात फसू नका असं संतांनी सांगितलं. परमेश्वर प्रेमाचा सागरही आहे आणि बीजही. त्यामुळे त्याच्यावर प्रेम करण्याने मनुष्यरूपी कल्पवृक्षातील पानंही आपल्यावर प्रेम करू शकतात आणि दुःखाच्या चक्रातून मुक्ती होऊ शकते (जन्म-मृत्यूच्या नव्हे). गीतेत, पंधराव्या अध्यायात 'उर्ध्वमूलमधःशाखम्' असा एक श्लोक आहे. सृष्टीरुपी विस्ताराला एक कल्पवृक्षाप्रमाणे कल्पिले, तर परमेश्वर त्या कल्पवृक्षाचे बीज आहे. या बीजाला आपल्या प्रेमाचे सिंचन केल्यास आपल्या संपर्कात येणाऱ्या मनुष्यात्म्यांकडूनही आपल्याला निर्व्याज प्रेमाची अनुभूती मिळते. हेच अध्यात्माचे खरे सूत्र आहे.

समर्थ रामदास म्हणतात  
देव प्रीति राखो जाणे  
देवासी करावे साजणे  
जिवलगी अवघे पिसुणे  
कामा न येती

ज्यांना या योगाविषयी माहिती नाही अशांकरिता - राजयोगाच्या साधनेविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आणि त्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी जवळच्या ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रावर जाऊन लाभ घेता येईल.

***



# मधुबनचा श्रृंगार-मोहिनी दीदीजी!

ब्र.कु. हेमंत, शांतिवन, आबूरोड

नवयुग रचण्यासाठी शिवपित्याने प्रजापिता ब्रह्माबाबांद्वारे रुद्र गीता ज्ञान यज्ञाची स्थापना केली, त्या यज्ञात सेवेचे नव-नवीन यशालेख स्थापन करणाऱ्या विशेष व्यक्तींची यादी छोटी नाही. अशा ईश्वरी सेवेत अतुलनीय योगदान देऊन यज्ञ इतिहासात अमीट स्थान प्राप्त करणाऱ्या रथी-महारथींच्या मालिकेतील यशस्वी ताऱ्यांपैकी एक अविस्मरणीय नाव म्हणजे, 'मोहिनी दीदीजी!' त्या दादी प्रकाशमणिजीं सारख्या परिसाच्या संगतीत उजळत गेल्या व अनेक कला गुणांनी विभूषित होऊन मधुबनच्या अनेक विभागांचं कुशल संचालन करत राहिल्या. ब्रह्माबाबांनी लावलेल्या छोट्याशा रोपाला विशाल वटवृक्ष बनविण्यात दादी प्रकाशमणिजींना मोहिनी दीदींनी पूर्ण साथ दिली. दादींच्या सेवासाथी बनून यज्ञाचं शिस्तबद्ध संचालन करण्यात त्यांनी मुख्य भूमिका बजावली. स्वत:तील वैशिष्ट्यांना कार्यात लावून सेवारथास गतीही दिली आणि मोहिनी दीदी सेवेच्या क्षितीजावर चैतन्य चांदणी बनून सदैव चमकत राहिल्या.

मोहिनी दीदींचा लौकिक जन्म लखनऊ येथे भक्तिभावनासम्पन्न धार्मिक कुटुंबात झाला. यज्ञाच्या आरंभी सेवेसाठी निघालेल्या बहिणी म्हणत, 'सात दिवसात भगवंताचं दर्शन करा', हे ऐकून मोहिनी दीदींच्या मनात जिज्ञासा जागी झाली व त्या आश्रमात पोहचल्या. त्यांना वाटलं होतं आश्रमात कुणी संन्यासी महात्मा भेटतील, मात्र त्यांचे स्वागत केले एका श्वेतवस्त्रधारी बहिणीनं आणि विचारलं,' कसं येणं केलंत?' त्यावर त्या म्हणाल्या, 'बोर्डावर लिहिलयं सात दिवसात भगवंताचं दर्शन होईल,' हे ऐकून बहिणीने विचारलं, 'गीता वाचलीय का?' तेव्हा त्या उतरल्या, 'मी ना गीता वाचलीयं, ना रामायण, मी तर शाळा शिकतेय.' बहिणीनं पुन्हा विचारलं, 'तुमच्या घरात कुणी भक्ती करतं का?' तेव्हा दीदी म्हणाल्या, 'माझे वडील शिवाची, आई अम्बा मातेची आणि आजी राधा-कृष्णाची भक्ती करतात, आमच्या घरी सर्व इतक्या जणांची भक्ती करतात, पण भगवंत कोण आहे?' हे ऐकल्यावर बहीण हसली व म्हणाली, 'काही हरकत नाही, इथे ईश्वर भेटेल.' मोहिनी दीदी कुटुंबियांसोबत अरविंद आश्रमात जात व तिथे डोळे बंद करुन योग करत. तसंच इथेही त्या डोळे बंद करून बसल्या. टिचर बहिणीने डोळे उघडे ठेवायला सांगितलं. त्यानंतर बहीण जसं बोलत गेली, तसं त्या मनातल्या मनात म्हणू लागल्या. त्यांना वाटलं कुणीतरी मला खेचतंय, पण इकडे तिकडे पाहिल्यावर कुणीच दिसलं नाही. तेव्हा पुन्हा त्या मनात पुटपुटू लागल्या, 'मी आत्मा आहे...व क्षणभरात ट्रांसमधे गेल्या. त्यांनी पाहिलं की समोरुन दुर्गा अम्बा माँ येतेय व म्हणतेय, 'इथे ये, मी तुला न्यायला आलीय.' तेव्हा दीदी म्हणाल्या, 'मला नाही यायचंय' त्यानंतर एक वृद्ध व्यक्ति आली व म्हणाली, 'मुली मी तुला न्यायला आलोय, चल, आता परत घरी (परमधामी) जायचयं,' देवदूतासारख्या दिसणाऱ्या वयोवृद्धास पाहून त्या आकर्षित तर झाल्या, तरीही म्हणाल्या, 'मला आता नाही जायचं,' थोड्या वेळाने त्या ध्यानावस्थेतून जागे झाल्या व मातेश्वरींचा फोटो पाहून म्हणाल्या, 'ह्या कोण आहेत?,' बहीण उत्तरली,' ह्या आमच्या मम्मा आहेत.' तेव्हा त्या म्हणाल्या, 'हे कसं शक्य आहे? मी तर त्यांना अंबा मातेच्या रुपात पाहिलं.' जवळच ब्रह्माबाबांचा फोटो पाहून विचारलं, 'हे कोण आहेत?' बहीण म्हणाली, 'हे आमचे ब्रह्माबाबा आहेत.' त्यावर दीदी म्हणाल्या, 'ह्या दोघांना तर मी वर (ध्यानात) पाहिलं.' त्यांना गोंधळलेलं पाहून बहीण म्हणाली, 'आज पहिला दिवस आहे, रोज आलीस तर हळू-हळू सर्व कळेल.' घरी जाऊन आईला तिथला सर्व

वृतांत सांगितला, आई म्हणाली, 'अशा ठिकाणी जाऊ नकोस, तिथे जादू करतात.' आईला हो म्हणून त्या झोपी गेल्या. सकाळी चार वाजता कुणीतरी खाट हलवून म्हणत होतं, 'चल मी तुला न्यायला आलोय,' त्या म्हणाल्या, 'मला नाही मराचयं (नाही यायचयं)' असं दोन दिवस घडलं. अखेर तिसऱ्या दिवसी त्या सेवाकेंद्रावर गेल्या, साप्ताहिक कोर्स पूर्ण केला आणि अशा प्रकारे साक्षात्काराद्वारे दीदींचं वयाच्या बाराव्या वर्षी १९५३ मधे ज्ञानमार्गात पदार्पण झालं.

एके दिवशी बहीण म्हणाली, 'आबू पर्वतावर भगवंताचं अवतरण झालयं. त्यांच्या कुशीत गेलीस तर स्वर्गाची मालक होशील' ही गोष्ट दीदींच्या बालमनात रुजली. बहिणीं सांगत असे लवकरच सृष्टी परिवर्तन होईल. म्हणून दीदींना वाटलं त्याआधी भगवंताला भेटलं पाहिजे, त्या वेळी त्या मैट्रिक म्हणजे दहावीत शिकत होत्या. आबूला जाण्यासाठी वडिलांना विचारलं, पण ते म्हणाले, 'आधी शिक्षण पूर्ण कर अन् मग जा,' परंतु दीदींनी उत्साहाने पांढरे कपडेही शिवले होते. त्यांचे मेहुणे ज्ञानमार्गात होते, त्यांना त्या म्हणाल्या, 'तुम्ही मधुबनला चला, तुमच्या सोबत मलाही परवानगी मिळेल.' परंतु ते नाही म्हणाले, तेव्हा त्या एकट्याच आबूला जायला निघाल्या. जात होत्या खुशी-खुशीने, पण गाडी सुरु होताच त्यांना रडु कोसळलं कारण आई वडिलांना सोडून कधी कुठे गेल्या नव्हत्या. पुढे दिल्लीत काही बहिणी सोबत भेटल्या. ट्रेन, आबू स्टेशनवर आली. तेंव्हा अम्बाजीत मेळा होता, सर्व बस तिकडेच जात होत्या. अखेर आठ वाजता आबूची बस मिळाली व त्या कोटाहॉऊस मधे पोहचल्या आणि त्यांचं मधुबन जायचं स्वप्न पूर्ण झालं. हेच ते गोड, – मधुबन, शुभ्रवस्त्रधारी भाऊ बहिणींच्या तपस्वी चेहऱ्यावर पसरलेल्या मधुर हास्यांने त्यांचं स्वागत केलं. मात्र त्यांची नजर मधुबनरुपी डब्बीत लपलेल्या त्या कोहिनूर हिऱ्याला (बाबांना) शोधत होती. तो क्षणही आला ष दीदींच बाबांशी मधुर मिलन झालं.. बाबांना पाहताच त्या एकटक पाहतच राहिल्या.. श्वेतवस्त्रधारी, उँचपूरा बांधा, उन्नत ललाट, असाधारण अन् आकर्षक व्यक्तिमत्व.. बाबांच्या मस्तकांवरून ज्योतिची आभा झळकत होती. नेत्रांतून वात्सल्य, प्रेम, शक्ति, दया सर्व काही एकाच वेळेस पाझरत होतं. ओठांवर स्मित हास्य असलेल्या बापदादांना त्या साक्षात् न्याहाळत होत्या.. दीदींना दिव्य अनुभूती होत होती की जणू काही बाबांनी त्यांच्यातली सारी शक्ती वश केली होती, त्यांचे मन-बुद्धी एकदम शांत झाले आणि त्या कायमच्या बाबांच्या झाल्या.

मोहिनी दीदींनी लखनऊ येथे शिक्षण पूर्ण करुन सन् १९५९ मधे सर्वस्व समर्पण केलं. बालपणीच आध्यात्मिक ज्ञानाच्या मनन-चिंतनाचा दीदींना व्यासंग होता, त्यासोबत ईश्वरी सेवेची खूप आवडही होती, म्हणूनच ब्रह्मबाबा साकार रुपात असतानाच त्या ईश्वरी सेवेसाठी निघाल्या. उत्तर प्रदेशातून उगम पावलेल्या ह्या ज्ञान गंगेनं पंजाबच्या धरणीलाही आध्यात्मिक ज्ञान व राजयोगाच्या शिक्षणाचं पाणी दिलं. मुख्यालय आबू पर्वत येथील नजीकच्या सिरोही, जालोर, पाली, भिनमाल इत्यादी सेवाकेंद्रांच्या स्थापनेत निमित्त बनून दीदींनी राजस्थान मधे सेवांचा विस्तार केला. राजयोगिनी आत्मइंद्रा (गंगे) दादीजी अव्यक्त झाल्यानंतर उत्तर प्रदेशच्या क्षेत्रीय संचालिका बनून कार्यभार सांभाळला. दीदींनी ग्राम विकास प्रभागाच्या अध्यक्षा बनून ग्राम्य भारताच्या प्रगतीचा विडा उचलला आणि आधी कधीही न झालेले सेवेचे अभिनव उच्चांक स्थापित केले. योगिक शेती हा नवीन प्रकल्पही त्यांच्या प्रेरणांनी खूपच फुलला आणि राजयोगाच्या साधनेमुळे पडीक भूमीला सुपीक वसुंधरा बनविणारा हा प्रकल्प यशाची शिखरं गाठत राहिला. त्यांनी राजनैतिक प्रभागाच्या उपाध्यक्षा बनूनही सेवा केली. मुख्यालय व देश-विदेशात सम्मेलनात, दीदींनी उत्साहाने भाग घेतला.

पिताश्री ब्रह्मबाबा, मातेश्वरी जगदंबा सरस्वती आणि दीदी दादींचे स्नेह सानिध्य प्राप्त करणाऱ्या मोहिनी दीदी पद्मापद्म भाग्यशाली प्रभुरत्न होत्या. ब्रह्मबाबा त्यांना प्रेमाने 'देवकन्या' म्हणत. दीदींच्या मुखमण्डलावर प्रसन्नतेच्या पाकळ्या सदैव उमललेल्या दिसत. त्यांना भेटण्यासाठी आलेल्यांमधे नवआंगतुक अतिथी असो वा कुणी मधुबन निवासी किंवा सेवाकेंद्रावरुन आलेले ब्रह्मवत्स, त्या सर्वांशी सहजतेने भेटून सर्वांची झोळी स्नेहसुमनांनी भरत. कुणी एखाद्या समस्येमुळे चिंतीत होऊन, निवारणासाठी गेला, तर भेदभाव न करता, छोटा असो वा मोठा, गरीब असो वा श्रीमंत सर्वांशी समभाव ठेवून भेटत. प्रत्येकाची मनातली गोष्ट खूप संयमाने ऐकत आणि यथा सम्भव स्नेह सहयोग देऊन संतुष्टही करत. त्यांच्या त्या

वैशिष्ट्यामुळे कुणीही त्यांचा सहजच स्नेही बनून त्यांना भेटायला आतुर होत असे. 'जैसा नाम वैसा काम' ह्या म्हणीनुसार 'मोहिनी' नावाला सार्थक करणाऱ्या मोहिनी दीदी एक संदेश पुत्री (ट्रान्समेसेन्जर) ही होत्या, त्या राजयोग कामेंट्री करुन नवआगुंतकांना राजयोगाची अनुभूति करवत.

जेव्हा प्रकाशमणी दादींसोबत मोहिनी दीदी विदेशातून सेवा करुन येत, तेव्हा आम्ही मधुबन निवासी स्टेजवर विविध आरास सजवून स्वागत करत असू, तेव्हा दीदी आमचं मनापासून कौतुकही करत. त्या कला पारखी अन् कला प्रेमीही होत्या. खऱ्या अंतःकरणाने सेवा केल्यावर त्या अति प्रसन्न होऊन सेवाधारींना स्नेह व सहयोगाद्वारे पुरस्कृत करत. कुणाला काही आवश्यकता भासली तर उदार ह्रदयाने गरजा पूर्ण करत. त्या शब्दाच्या फार पक्क्या होता. कुणाला वचन दिलं तर कठोरतेने पाळत. वेळोवेळी यज्ञवत्सांत उत्साह भरण्यासाठी नवनवीन स्थळांवर सहलीलाही पाठवत. पाककलेत दीदींना फार रुची होती. भोलानाथ शिवबाबांच्या भण्डाऱ्यातून त्या ब्रह्मावत्सांसाठी मोठ्या आवडीने ब्रह्माभोजन बनवून घेत. जर भोजनात त्यांना काही त्रुटी लक्षात आली तर लगेच सम्बंधित भावाला बोलवून उचित निर्देश देत. त्या म्हणत, 'भगवंताच्या घरी आलेले ब्रह्माभोजनाने तृप्त व्हायला हवेत. त्या स्नेह आणि शक्तिस्वरुपात संतुलन ठेवून संघटनाला बांधून ठेवत. विकराल परिस्थितींचा निर्भयतेने सामना करत व हिमतीचे पाऊल उचलून असम्भव असलेलं सम्भव करत. सत्यतेची शक्ती त्यांच्या रोमारोमात सामावलेली होती, त्या सत्यतेच्या बळावर कठीण परिस्थितींनाही शिवबाबांच्या आठवणीत हसत-हसत पार करत. मोहिनी दीदीजी निर्विघ्न यज्ञ कारभार चालविण्यात प्रकाशमणी दादींना साथ देत राहिल्या.

फुलांचे सौंदर्य आणि नयनरम्य हिरवळीने नटलेल्या वनराईवर प्रेम करणाऱ्या मोहिनी दीदीजी एक संवेदनशील निसर्ग प्रेमी ही होत्या. मधुबनच्या प्रांगणाला सौंदर्य प्रदान करणाऱ्या सदाहरित बागा त्यांच्याच प्रेमाचा पुरावा होत. मलाही फुलबागेची खूप आवड होती. मातेश्वरी भवनात मी टाकाऊ वस्तुंपासून रॉक गार्डन बनवला होता व अवतीभोवती पुष्पवाटिका सजवली होती. दीदीजी त्या वाटिका पाहून खूप खूश होत व प्रोत्साहित करत. खरं तर मोहिनी दीदी म्हणजे रमणीकता, प्रसन्नता, हर्षितमुखता, विनोदप्रियता, साहस, हिम्मत इत्यादी गुण-सुमनांनी सजलेल्या मधुबनचा एक श्रृंगारच होत्या. प्रभु उपवनातील अलौकिक पुष्प बनून ब्रह्माबाबांच्या साकार संगोपनाचा सुंगध दरवळत दरवळत अखेर ७ सप्टेंबर २०१६ रोजी मोहिनी दीदी परमात्म्याच्या कुशीत सामावल्या. अशा मधुबनच्या श्रृंगार मूर्तींला अमुचे शत् शत् नमन.

***

---

(पृष्ठ क्र.४ वरुन)

**६. निश्चय आणि विश्वासाच्या बळावर यज्ञाची उन्नति :**

दादीजींना स्वतःवरती आणि बाबांवरती निरतिशय विश्वास होता. तोच विश्वास त्यांनी प्रत्येक यज्ञवत्सावरही दाखवला. प्रत्येकाची स्वउन्नती व्हावी म्हणून त्यांनी प्रत्येक यज्ञवत्साला सेवेची जवाबदारी दिली. मधुबन महायज्ञासारख्या स्थानी सेवेच्या प्रत्येक कार्यक्षेत्रात त्या स्वतः हजर राहत. हजर राहून प्रत्येकाची विचारपूस करत असत. एखाद्या वस्तूची कमतरता दिसताच त्या लगेच हव्या असलेल्या वस्तू वा साहित्य त्या विभागात पाठवत असत. त्यामुळे प्रत्येक यज्ञवत्स विश्वासाने दादीजींनी दिलेले कार्यक्षेत्र पार पाडत असत.

**७. जसे लक्ष्य तसे लक्षण :**

दादीजींनी सुरूवातीपासून ब्रह्माबाबांसमान संपन्न आणि संपूर्ण बनण्याचे उद्दिष्ट आपल्या समोर ठेवले होते. त्यांनी ब्रह्माबाबांना जसेच्या तसे अनुसरले. ब्रह्माबाबांनी जसे कर्मरूपी पाऊल उचलले तसे दादीजींनी आत्मसात केले. दादीजींना पाहताच ब्रह्माबाबांची छबी त्यांच्या मध्ये दिसू लागे. अशा महान तपस्वी, राजयोगिनी दादी प्रकाशमणि यांनी ब्रह्माबाबांसमान निर्मम राहून आपली कर्मातीत स्थिती गाठली आणि २५ ऑगस्ट २००७ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून संपूर्ण स्थिती प्राप्त केली. अशा महान विभूतिला सर्व ब्रह्मा वत्सांचा शतशः प्रणाम.

***

# "शिवबाबा : माझा पाठीराखा"

## (भाग ४)

## म्हैशी परतल्या बाबामुळे

ब्र.कु. बापू , कोल्हापूर

**शेतकरी कुटुंबात जन्मलेले कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगावचे रहिवासी ६५ वर्षीय बापूभाई आजन्म ब्रह्मचारी ब्रह्माकुमार आहेत. त्यांना आजवर आलेले ईश्वरी अनुभव थक्क करणारे आहेत. आपणा सर्वांसाठी क्रमशः प्रसिद्ध करत आहोत...**

१९७९ साली मी ज्ञानमार्गात आलो. त्यावेळी माझी आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. शेतात काम करण्यासाठी गड्याला दिवसा तीन रूपये तर बाईला दोन रूपये इतकी हजेरी (पगार) होती. १९७५ साली मी जुन्या एस.एस.सी.ला म्हणजे अकरावीला होतो. आमचे हायस्कूल आमच्या गावापासून चार कि.मी.अंतरावरील सडोली गावात होते. सायकल माझ्याकडे नसल्याने मी हायस्कूलला चालत जात असे. शिवाय दर रविवारी तीन रूपये हजेरीवर लोकांकडे काम करत असे. अशातच १९८० साली माझ्या वडिलांनी शरीर सोडले. भाऊ आपली वाटणी घेऊन स्वतंत्र झाला. मी, माझी आई आणि एक अविवाहित बहीण अशा कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर आली.

त्यात माझ्या बहीणीने अचानक शरीर सोडले. मग मोठ्या बहिणीच्या मुलीला आईच्या मदतीसाठी घरी आणले. काही वर्षांनी तीही लग्न होऊन आपल्या पतीच्या घरी गेली. मग मी आणि आई असे दोघेच घरात उरलो. आमची शेती होती आणि जोडीला तीन म्हैशी होत्या. शेतीचे व जनावरांचे आवरून मी कोल्हापूरला ब्रह्माकुमारी सेंटरवर नियमित जात असे.


एकदा कोल्हापूरच्या सेंटरवर गेलो असता सेंटरच्या मोठ्या दीदी राजयोगिनी सुनंदा बहनजी मला म्हणाल्या, "बापूभाई तुम्ही दुधाचा व्यवसाय का सुरू करत नाही ?" त्यांच्या प्रेरणेमुळे आणि प्रोत्साहनामुळे मी दूध विक्रीचा व्यवसाय सुरू केला. गावातून दूध घेऊन मी सायकलवरून कांडगाव ते कोल्हापूर १४ कि.मी. रपेट मारत असे. जाता – येता दररोज माझे २८ कि.मी. सायकलिंग होत असे. शेती, तीन म्हैशी, दूध विक्री आणि बाबांची सेवा यातच माझा वेळ जाई.

पुढे माझ्याकडे मोटरसायकल आली. पण माझी धावपळ काही कमी होत नव्हती. त्यामुळे म्हैशींच्याकडे माझे कधी कधी दुर्लक्ष होई. आमच्या तीन म्हैशी होत्या. एकदा काय झालं,तीन म्हैशीपैकी दोन म्हैशी घरी आल्या. पण एक म्हैस आलीच नाही. मलाही काही कळेना. आईपण माझ्यावर रागावली. ती म्हणाली, "तुझा बाबा आणतोय का बघ म्हशीला. काय तुझी ताकद हाय ती दाखीव. मी तर हैराण झालो होतो. सकाळपासून सगळं गाव धुंडाळलं. शेजारच्या गावात बघितले. पण व्यर्थ ! दुपारचे १२ वाजले आणि बाबांनी मला प्रेरणा दिली की म्हैस तुझ्या शेतात आहे. शेतात गेलो तो म्हैस व्याली होती. त्यामुळे घरी येऊ शकत नव्हती. मी बाबांचे आभार मानले.

कधी कधी सेवा जास्त असली की घरी जनावरांसाठी वैरण नसायची. घरी वैरण नव्हती. मी बाबाला सारखं म्हणत होतो, घरात वैरण नाही! आई मला रागावल्याशिवाय राहणार नाही. संध्याकाळचे सहा वाजले होते. मी मोटरसायकलवरून घरी निघालो होतो. एवढ्यात रस्त्यावर एक माणूस माझी वाटच पाहत होता. तो म्हणाला, "येथे ऊसाचे वाडे आहे. हे सगळे तू घेऊन जा. माझ्या म्हैशींना आयता चारा मिळाला." मी मनोमन म्हणालो, "बाबा हमारे साथ है तो डरने की क्या बात है !"

परत एकदा अशीच परीक्षा माझ्या पुढ्यात आली. सकाळी सकाळी नदीवरून म्हैशी धुवून मी त्यांना घराकडे

(पृष्ठ क्र.१३ वर)



चिंतन

# गुरुपौर्णिमा

ब्र.कु. बाळू, सोलापूर

गुरुपौर्णिमेला 'व्यासपौर्णिमा' असेही म्हणतात कारण हा दिवस म्हणजे व्यासांचा जन्मदिन मानतात. खरं तर 'व्यास' हे कुणा एका व्यक्तीचे नाव नसून ही पूर्वी वापरात असलेली पदवी होती. वर्तुळाला विभागणारी सर्वात मोठी रेषा म्हणजे 'व्यास' असे आपण भूमितीत शिकतो, त्याप्रमाणे व्यासांनी वेदांचे विभाजन केले. वेद विभाजन करून ते सर्वांसाठी उपलब्ध केले म्हणून 'वेदव्यास' हे नावही प्रचलित झाले. पुढे त्या वेदांवर अनेकांनी टीका (निरुपणे) लिहिली. या सर्व मंडळींना 'व्यास' पदवी मिळत गेली. जसे शंकराचार्य ही पदवी आहे तसेच. या पार्श्वभूमीमुळे गुरुपौर्णिमेला 'व्यासपौर्णिमा' म्हणतात.

गुरुपौर्णिमेविषयी आणखी एक संदर्भ वाचनात येतो तो म्हणजे महात्मा बुद्धांचा. काही ठिकाणी उल्लेख आढळतो, बुद्धांना या दिवशी दिव्य ज्ञान किंवा आत्मानुभूती झाली. तर काही उल्लेखानुसार गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांनी आपली दिव्य वाणी प्रथम प्रकट केली. पहिले व्याख्यान दिले. तात्पर्य काय तर बौद्ध धर्मातही या दिवसाचे आगळेवेगळे महत्त्व मानले गेले आहे.

कालौघात शिक्षकालाच गुरू मानण्याची परंपरा सुरू झाली. गायन क्षेत्रात किंवा कलेच्या क्षेत्रात शिक्षकालाच गुरू मानल्याचे आपण पाहतो. पूर्वी गुरुगृही विद्या प्राप्त होई म्हणजे शिक्षक आणि गुरु दोन्ही एकच असत. मात्र आता शिक्षक जे शिकवतो ते चरितार्थाकरिता उपयोगी लौकिक किंवा भैतिक ज्ञान आणि भक्तिमार्ग किंवा अध्यात्माच्या मार्गावर मार्गदर्शन करणारा तो गुरू अशी सोपी व्याख्या आताच्या काळात करता येईल.

गुरूचा महिमा मोठा मानला आहे. गुरुलाच 'परब्रह्म' म्हटले गेले आहे किंवा गुरू देवापेक्षाही मोठा म्हटले गेले आहे. तसे मानण्याचे कारणही दिले जाते, गुरूच देवापर्यंत नेतो म्हणून तो मोठा अशी पूज्य भावना असते. अशा भावनेपोटीच तुकोबाराय सांगून गेले असावेत स्वामिकाज, गुरुभक्ती... हेचि विष्णूची महापूजा किंवा गुरुकृपे मज बोलाविले देवे... कबिरांच्या एका दोह्यात पहा काय उल्लेख येतो –

गुरु कुम्भार है शिष (शिष्य) कुंभ है
गढि गढि काढै खोट
अंतर हाथ सहार दे
बाहर बाहै चोट

म्हणजे जसे घडा बनवताना कुंभार, त्यातील बारीक बारीक दगड काढतो. गोलाकार करताना बाहेरून थापट्या मारतो; पण आतून हात धरून घड्याला आकार देतो. तसे शिष्यरूपी घडा गुरु घडवत असतो

भक्तिमार्गात व इतिहासात गुरु–शिष्यांच्या अनेक जोड्या प्रसिद्ध आहेत. समर्थ रामदास– शिवाजी महाराज, रामकृष्ण परमहंस–स्वामी विवेकानंद

या नात्यांतून आज्ञाधारकपणा, समर्पण यासारखे गुण शिकायचे असतात. महर्षि दयानंद सरस्वतींचे नांव आपल्याला ठाऊक असेल. त्यांचे गुरु होते 'स्वामी विरजानंद'. विरजानंद दृष्टिहीन होते. आश्रमांतील पडेल ते काम दयानंद करत असत. एकदा दयानंदांनी केर गोळा करून ठेवला होता आणि तो उचलण्याच्या आतच इतर काही शिष्यांनी विरजानंदांना त्या जागेवरून पुढे नेले. साहजिकच गुरुंच्या पायाला केर लागला व त्यांना दयानंद कसा कामचुकार आहे ते रंगवून सांगण्यात आले. परिणामी गुरुंनी दयानंदांना बेदम मार दिला. छडीचे सपासप वार पाठीवर झेलणाऱ्या दयानंदांनी, गुरुंचे पाय मात्र सोडले नाहीत. इतर शिष्य दयानंदांविषयी असूया बाळगून होते, कारण दयानंदांची मेधावी बुद्धी गुरुंच्या मनाला सुखावत

(पृष्ठ क्र.१५ वर)



ब्रह्मावत्सांकरिता

# व्यग्र कसे रहावे ?

ब्र.कु. डॉ. सचिन, ग्लोबल हॉस्पिटल, मा. आबू

एक काल्पनिक कथा आहे. ईसाई धर्माचे संस्थापक जीजस क्राइस्ट आपल्या १२ शिष्यांना म्हणाले, ''तुम्हाला स्वर्गात जायचे असेल तर, माझ्या मागे-मागे चालायला लागा. त्या सर्वांना लाकडी क्रॉस दिले आणि स्वत: एक मोठा क्रॉस घेऊन ते चालू लागले. न भोजन न पाण्याचा एक थेंब मिळत होता, निर्जला यात्रा करायची होती. ती पण ४० दिवस. परंतु त्यातील 'यहुदा' नामक शिष्याने मार्गात येणाऱ्या अडचणींनुसार आपला क्रॉस थोडा-थोडा कापला गेला. ४० दिवसांनंतर जेव्हा स्वर्गात प्रवेश करण्याकरिता. जिजसने आपापला क्रॉस आडवा टाकून त्यावरून चालत जाऊन दरी पार करत स्वर्गात प्रवेश करायला सांगितले. त्यावेळी यहुदाचा क्रॉस कापत गेल्यामुळे छोटा झाला होता, त्यामुळे तो त्या दरीत पडतो. बाकी सर्व शिष्य जिजस बरोबर स्वर्गात जातात.

असेच आपणसुद्धा यात्रेलाच निघालो आहोत. ही यात्रा दुर्गम, कष्टदायक आहे. परंतु ज्यांच्या मनात विश्वास आहे, त्यांच्या करता तो क्रॉस प्रतीक आहे, ''प्रभू प्रेमाचे''. ज्यांनी मार्गात येणाऱ्या फक्त समस्याच बघितल्या त्यांचा क्रॉस छोटा होत गेला म्हणजे ते प्रभू प्रेमच जणू आटत गेले. ही यात्रा कठीण आहे. जो मार्गात येणाऱ्या समस्या बघत राहील तो आपल्या ध्येयापर्यंत पोहचू शकणार नाही. कारण माया पावला पावलावर निरंतर अडचणीरुपी काटे उभे करते. आपले प्रत्येक पाऊल आपल्यालाच सांभाळून टाकले पाहिजे. निरंतर कोणती न कोणती समस्या, निरंतर कोणत्या ना कोणत्या विकाराचे आक्रमण.... काय करावे आम्ही अशावेळी, यात्रा सहजपणे पार करू आणि त्या स्वर्णिम राज्यात पोहोचू यासाठी काय करावे ?

माया निरंतर नवनवीन रूप धारण करून येईल, परंतु आपल्याला मायेशी युद्ध करायचंय, मायेला परास्त करायचे आहे. मायेच्या वशीभूत व्हायचे नाही, आणखी एक सूक्ष्म गोष्ट - माया आपल्याला शिकवते. कदाचित ती इतर कोणी शिकवू शकणार नाही. माया आपली शिक्षक आहे. जेव्हा-जेव्हा विकारांनी उचल खाल्ली, एखादी कमतरता समोर आली तर कोणत्या जुन्या संस्कारांनी आक्रमण केले ? हा विकार कोठून आला ? विचार केला तर माया आपली शिक्षक आहे; बाहेर वादळ आले आहे एक खिडकी जरी उघडी राहिली तरी वादळ घरात घुसेल. रोज स्वत:चे परीक्षण करणे गरजेचे आहे. मायेकरता कोणता दरवाजा तर उघडा राहिला नाही ? एकांतात असताना कोणती माया आली ? संघटनात कोणती ? अमृतवेळेला, मुरलीच्या वेळी कोणत्या प्रकारची माया आली ? आणि येते तेव्हा काय करते ? कोणता धडा शिकवून जाते ? तिची भूमिका सूक्ष्मतेने समजून घेऊन प्रगती करत राहिली पाहिजे. माया आपल्याला निरंतर सम्पर्क करण्याचा प्रयत्न करेल, संदेश पाठवत राहील, परंतु मायेनी कधीही सम्पर्क करण्याचा प्रयत्न केला तरी तिला एकच संदेश पोहचला पाहिजे, ''ह्या मार्गावरील सर्व क्रमांक व्यग्र आहेत, थोड्या वेळाने प्रयत्न करावा.'' आपल्याला व्यग्र रहायचे आहे ते केवळ आणि केवळ एकाच गोष्टीमध्ये ते म्हणजे ''प्रभू प्रेम''. ह्या ईश्वरी प्रेमात इतके आकंठ बुडून जायचे आहे जेणेकरून संसारातील कोणत्याच गोष्टी आठवणार नाहीत. असे काय केले पाहिजे जेणेकरून आपण त्या प्रभू प्रेमात आकंठ बुडून जाऊ. मन, बुद्धी कोणत्या तरी ध्येयाने आसक्त असेल, तर इकडे-तिकडे व्यर्थ मध्ये अडकणार नाही. ज्याला काही मिळवायचे आहे, काही प्राप्ती करायची आहे, त्याचे मन, बुद्धी कधीही इकडे तिकडे भटकणार नाही. एखादे ध्येय नसेल तर, अचानक विकार आक्रमण करतील त्यामुळे स्वत:ला सदैव व्यग्र ठेवणे गरजेचे आहे, सोपा उपाय आहे - ''प्रभू प्रेम''.

ह्या प्रभू प्रेमाच्या १६ परिभाषा आहेत. बाबांवर प्रेम करणे म्हणजे ह्या १६ गोष्टींवर प्रेम करणे. ह्या मधील एका गोष्टीवर जरी प्रेम कमी असेल तर आपल्या प्रभू प्रेमातही काही उणीव आहे असे समजावे –

**१) पहिली परिभाषा –**

बाबांवर प्रेम अर्थात् त्यांच्या ज्ञान मुरलीवर प्रेम – त्यांच्या वाणीवर प्रेम, एकेका शब्दावर प्रेम, त्यांच्या प्रत्येक विधानावर प्रेम. काल ऐकलेल्या ज्ञान मुरलीमध्ये बाबा काय म्हणाले होते? आत्ताच ऐकलेल्या मुरलीमध्ये बाबा काय म्हणाले? ते आठवण्याचा प्रयत्न करणे. एकांतात बसून त्या एकाच्या अंतापर्यंत जाणे. बाबांनी काय सांगितले त्याची उजळणी करणे. उजळणी करण्याने जे वाचले, जे ऐकले ते आठवत गेले की, मन लगेच एकाग्र होते.

प्रभू प्रेम अर्थात् मुरलीवर प्रेम यातच मग्न होऊन जा. व्यग्र होऊन जा. सकाळी जी मुरली ऐकली, वाचली त्यातील मला काय समजले, किती समजले, किती खोलवर जाऊ शकतो मी? इंग्रजीतील एका म्हणीप्रमाणे ''मनुष्याने विज्ञानाला अजून पूर्णपणे जाणलेच नाही, फक्त वरवरचाच अभ्यास केला आहे.'' तसेच आपणही मुरली वरवरच समजलो आहोत. अजून त्याच्या खोलात, त्याच्या अंतरंगापर्यंत पोहोचलोच नाही. कोणी कितीही म्हणाले माझे बाबांवर खूप प्रेम आहे, परंतु रोजच्या मुरलीचे जर मनन, चिंतन, अभ्यास होत नाही तर, ते खरे प्रभू प्रेम नाही, असेच म्हणावे लागेल. चिंतनाची उणीव असल्यामुळे नावीन्याचा अनुभव होत नाही. मुरली अध्ययनात नावीन्य आणण्याकरता आवश्यक ३ गोष्टी – १) मौन २) एकांत ३) अंतर्मुखता कोणी कितीही व्यग्र असाल तरी मौन, एकांताला जणू जीवनाचा भाग बनवायचा आहे, त्याचा अभ्यास करणे जरुरी आहे. बाह्य जगतापासून मन अलिप्त करून अतुलनीय चिंतनामध्ये मन एकाग्र करणे, आवश्यक आहे. अचानक अनेक प्रश्नांची उत्तरे समोर येतील. जेव्हा जागृत मन शांत होईल तेव्हा सुप्त मन जागृत होते.

मुरली सर्व प्रश्नांच्या उत्तराचा, समाधानाचा सिंधू आहे. आपणच अजून त्यांच्या खोलवर गेलो नाही. स्वत: परमेश्वरच (शिवबाबा) म्हणतात. वर वर पोहत राहाल तर मासे हाताला लागतील, खोलवर त्या सागराच्या अंतरंगात जाल तेव्हा मोती सापडतील. म्हणूनच प्रभू प्रेम म्हणजे त्याच्या मुरलीवर पण प्रेम. केवळ वह्यांमधे लिहिणे नाही तर, त्याचे मनन करणे, चिंतन करणे, त्याची उजळणी करणे, आणि स्वत:मध्ये धारण करणे. व्यक्तला अव्यक्त मध्ये आणि अव्यक्तला व्यक्त मध्ये घेऊन येणे. जेव्हा आपण मुरली वाचायला घेतो तेव्हा माया सम्पर्क करण्याचा प्रयत्न जरूर करेल, परंतु तिला एकच उत्तर मिळेल, ''ह्या मार्गावरील सर्व क्रमांक व्यग्र आहेत थोड्या वेळाने प्रयत्न करावा.'' हे करून पहा, नक्कीच यश मिळेल.

**(अनुवाद : ब्र.कु. विद्या, ठाणे)**

***

---

(पृष्ठ क्र.१० वरुन)

पाठविले आणि वैरण (चारा) आणायला गेलो. वैरण घेऊन घरी आलो आणि दूध घेऊन कोल्हापूरला गेलो. इकडे काय झाले? नदीवरून घरी पाठविलेल्या म्हैशी परतल्याच नाही. त्यावेळी मोबाईलचीही सोय नव्हती. दुपारी तीन पर्यंत आईने माझी वाट पाहिली. तीन वाजता मी घरी आल्या – आल्या माझ्यावर राग काढला. म्हणाली आज घरी म्हैशी आल्याच नाहीत. काय करायचे ते तूच आता बघ. नाहीतर तुझ्या त्या बाबाला काठी घेऊन म्हैशी शोधून आणायला सांग. त्यात त्या म्हैशींबरोबर आईचे लाडके कुत्रेही गायब झाले होते.

मी बाबाला कळवळून म्हणालो, ''का बाबा तू माझी अशी सारखी सारखी परीक्षा बघतोस? असे करत रात्र सरली आणि बघतो तर काय पहाटे अमृतवेळेला दारावर धडक मारल्याचा आवाज ऐकायला आला. दार उघडून पाहतो तर तिन्ही म्हैशी आणि आईचे लाडके कुत्रे हजर!''

बाबांची कृपादृष्टी माझ्यावर किती म्हणायची ती ! माझ्या हातूनही बाबाची अशीच सेवा घडो हीच बाबाचरणी प्रार्थना!

क्रमशः

**(शब्दांकन : ब्र.कु. प्रा. दिनेश डांगे, कोल्हापूर)**

***

**सुविचार**

श्रीमंत होण्यासोबत गुणवंत होणे तितकेच महत्त्वाचे आहे.



# रक्षाबंधनाचे भावनिक आणि आध्यात्मिक महत्त्व समजून सण साजरे करा

ब्र.कु. प्रफुलचंद्र, सान डिएगो, यु.एस.ए

भारतात वर्षभरात अनेक धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय सण साजरे केले जातात. यामध्ये श्रावण महिन्यातील पौर्णिमेला रक्षाबंधनाचा सण साजरा केला जातो.

रक्षाबंधन हे आपल्या सांस्कृतिक परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. साधारणपणे भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण नावानेही ओळखला रक्षाबंधन हा मानला जातो. या दिवशी बहीण भावाला टिळा लावते, राखी बांधते आणि तोंड गोड करते. या दिवशी ब्राह्मण आपली जानवे बदलतात. या दिवशी समुद्राची नारळाने पूजा केली जाते. म्हणूनच तिला नारळी पौर्णिमा असेही म्हणतात. भाऊ-बहिणीचे पवित्र नाते दृढ करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. भावाच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी बहिणीची आपुलकी आणि शुभेच्छा व्यक्त करण्याचा हा सण आहे. प्रत्येक प्रकारे बहिणीच्या रक्षणासाठी भावाची बांधिलकी व्यक्त करण्याचा हा सण आहे.

माणसाला जन्मापासूनच अनेक प्रकारची भीती असते आणि जिथे भीती असते तिथे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. आपण अनेक प्रकारे स्वतःचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतो, परंतु या सर्वांमध्ये, आशीर्वादांचे संरक्षण, चांगल्या भावना आणि ईश्वराची अंतःकरणाच्या प्रेमळ व कृपा हे आपल्या सर्व आत्म्याचे सर्वात मोठे संरक्षण आहे. प्रिय व्यक्तीला अशा प्रकारचे भावनिक संरक्षण देण्याची अनेक उदाहरणे आपल्या धर्मग्रंथात आणि इतिहासात आहेत. अशी अनेक उदाहरणे आहेत जेव्हा माता आपल्या मुलांना राखी बांधतात, पत्नी आपल्या पतीला, बहिणी आपल्या भावांना. संरक्षणाची ही भावना अभिमन्यू प्रति कुंतीने रणांगणावर जाण्यापूर्वी राखी बांधून व्यक्त केली होती. देवाधिदेव इंद्राचा राक्षसांनी पराभव केला तेव्हा इंद्राणीने राखी बांधून इंद्र यांना सुरक्षित केले, जेणेकरून इंद्राचा विजय होईल. मेवाडची राणी कर्मवतीने हुमायूनला भावाच्या रूपात राखी पाठवून गुजरातच्या बहादूरशाहाने चितोडवर स्वारी केली असता संरक्षणाची विनंती केली आणि त्यानेही तिचा आदर केला आणि युद्ध संपवले.

विशेषतः हिंदू समाजात रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी भावाच्या मनगटावर राखी बांधतात आणि सर्व प्रकारच्या संरक्षणाची अपेक्षा करतात. राखी बांधल्याने खरंच रक्षण होऊ शकतं का, असा प्रश्न कुणालाही पडतो? इथे महत्त्व फक्त राखीचे नाही, तर राखी बांधताना बहिणीने आंतरिक मनाने दिलेले आशीर्वाद, शुभ भावना आणि शुभेच्छांचे आहे. महत्त्वपूर्ण अशा भव्य चैतन्याचा उत्सव हा केवळ निर्जीव प्रसंग नसावा. भावाकडून काही मिळवण्याचा बहिणीचा हक्क पूर्ण करणे दुय्यम आहे. पैसा किंवा दिलेल्या कोणत्याही गोष्टीला विशेष महत्त्व नसते, पण भावा-बहिणीमध्ये आपुलकी आणि चांगल्या भावना वाढवणे महत्त्वाचे असते.

आपल्या सणांमागील सांस्कृतिक, भावनिक आणि आध्यात्मिक रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रक्षाबंधन हा खरे तर दृष्टी आणि वृत्तीची शुद्धता राखण्याचा उत्सव आहे, विशेषतः स्त्रियांकडे, विकृत दृष्टीने न पाहता शुद्ध दृष्टीने पाहावे. हा शुभ सण आपण फक्त बंधू-भगिनींपुरता मर्यादित ठेवला आहे. विशेषतः आज जगात महिलांवरील अत्याचार, विनयभंग, बलात्कार आणि शोषणाच्या कथा वाढत असताना जागतिक स्तरावर या सणाचे महत्त्व वाढले आहे.

बहीण भावाला राखी बांधते तेव्हा ती त्याच्या कपाळावर टिळा लावते. या प्रणालीमध्ये दृष्टी बदलण्याची भावना समाविष्ट आहे. टिळा आत्म्याचे स्मरण आहे। आत्म्याच्या विस्मरणामुळे आणि भौतिक दृष्टीमुळे आज

व्यक्तीची दृष्टी आणि वृत्ती विकृत झाली आहे. त्याचे नकारात्मक परिणामही आपण समाजात पाहत आहोत. ही विकृत दृष्टी आणि वृत्ती केवळ आध्यात्मिक स्मृतीद्वारेच आणली जाऊ शकते. म्हणूनच वरील भावना समजून घेऊन बहिणीने भावाला टिळा लावला तर, सार्थक होईल. खरं तर टिळा हे ज्ञानाच्या तिसऱ्या डोळ्याचे पवित्र प्रतीक आहे. बहिण भावाला टिळा लावून त्रिनेत्री बनवते. शंकरांनी तिसरा डोळा प्रगट करून कामदेवाला भस्म केले होते, असे वर्णन शास्त्रात आढळते.

बहीण भावाचा बुद्धिमत्तेचा तिसरा डोळा उघडून त्याला दुर्गुण आणि वासना भस्म करण्याची सूचना देते. टिळा लावल्यावर बहीण राखी बांधते. राखी हा केवळ धागा नसून स्नेह आणि संयम यांचे महत्त्व सांगणारा पवित्र बंधनाचा धागा आहे.

भावाच्या हातावर राखी बांधून बहिणीला स्वतःचे संरक्षण तर हवे असतेच, शिवाय संपूर्ण महिला समाजाला भावाकडून संरक्षण मिळावे, अशी भावना व अपेक्षा असते. त्याच बरोबर भावाने, मानवी आत्म्याचा शत्रू म्हणजे वासना, क्रोध, लोभ, आसक्ती, अहंकार, स्वार्थ, लालसा, द्वेष इत्यादी दुर्गुणांपासून दूर राहणे अशी भावना असते.

त्यानंतर बहीण भावाला मिठाई खाऊ घालते आणि त्याचे तोंड गोड करते. हे देखील प्रातिनिधिक आहे. भावाच्या तोंडून नेहमी गोड आणि सत्य शब्द बाहेर पडले पाहिजेत हे यामागचे रहस्य आहे. भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो. ते आध्यात्मिकदृष्ट्या प्रतीकात्मक आहे. भेटवस्तू देण्यामागचा उद्देश असावा की बहीण नेहमी सुरक्षित, आनंदी आणि सुखी राहावी.

ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयामध्ये, रक्षाबंधनाचा सण अत्यंत महत्त्वाचा असून तो विशेष पद्धतीने साजरा केला जातो. ईश्वराला समर्पित होऊन, भगिनी निःस्वार्थपणे हे पवित्र दैवी रक्षणाचे बंधन समाजातील सर्व स्तरातील लोकांना बांधतात आणि इंद्रिय विकारांपासून दूर राहण्याची शुभ भावना व्यक्त करतात. संस्थेतर्फे विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमही आयोजित केले जातात. तुम्ही ही या पवित्र भगिनींना राखी बांधून आपले जीवन दिव्य बनवा.

**(अनुवाद : ब्र.कु. शितल, कॅनडा)**

***

---

(पृष्ठ क्र.११ वरुन)

असे. डोळ्यांतल्या आसवांचा गुरुचरणाला स्पर्श झाला तेव्हा ते थांबले. त्यांनी दयानंदांना विचारले, ''झालेल्या शिक्षेबद्दल तुझ्या डोळ्यांत पाणी का आले?'' तेव्हा दयानंद चटकन् म्हणाले, ''नाही गुरुजी मार मिळाला म्हणून पाणी नाही आले; पण व्यायामाने कणखर झालेल्या माझ्या शरीरावर मारताना तुमच्या हाताला कष्ट तर होत नाहीत ना!'' या चिंतेने पाणी आले. विरजानंदांनी लगेच दयानंदांना आपल्या बाहूंत घेतले. घट्ट मिठी मारून म्हणाले, ''आज या शेवटच्या परीक्षेतही तू उत्तीर्ण झालास. मला माहीत आहे कोण काम करतो आणि कोण नाही.'' असे असते समर्पण. अशा अनेक गुरु-शिष्यांच्या जोड्या अनेक गोष्टी शिकवतात.

गुरु म्हणजे जो आपल्याला ज्ञान देतो तो. कबीरांच्या एका दोह्यात संदर्भ आढळतो 'गु' म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे त्याचा समूळ नाश करणारा. जो अज्ञान दूर करतो तो. शास्त्रांत गुरुचे काही प्रकार वर्णिलेले आहेत, उदा. देवगुरु, ज्ञानगुरु, मानवगुरु.

पण सद्गुरु एकच असतो. तो म्हणजे परमेश्वर. परमेश्वराव्यतिरिक्त कुणीही सद्गति देऊ शकत नाही. सद्गति अर्थात् मनुष्याचे देवतेत रूपांतर. नर ऐसी करनी करें जो नर से नारायण बन जाए, असे नारायण बनण्याकरता जो कर्म शिकवतो तो सद्गुरु परमेश्वर. असा हा परमेश्वर, निराकार आहे त्याला स्वतःचा देहाकार नाही त्यामुळे तो मनुष्यतनाचा आधार घेतो आणि आपले दिव्य ज्ञान प्रकट करतो. ते दिव्य ज्ञान ब्रह्माकुमारी संस्थेद्वारे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य गेली अनेक दशके सुरू आहे त्याचा लाभ घ्या आणि आपलीही सद्गती करायची संधी सोडू नका हीच आग्रहाची विनंती.

***



# स्वानुभव

ब्र.कु. पीटर, कुलाबा

वयाच्या २० व्या वर्षी मी एका पंचतारांकित हॉटेलमध्ये काम करण्यास सुरवात केली. कामाचे ब्रेक-शिफ्ट स्वरूप, खूप थकवणारे असायचे. लांबलचक कामाचे तास, अत्यंत आकर्षक सजावट करून मांडलेल्या विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची तीव्र इच्छा या साऱ्याचा परिणाम म्हणून माझ्या शरीर आणि मनावर प्रचंड ताण आला. बदलत्या जीवनशैलीमुळे होणारी रोजचीच डोकेदुखी, पित्तप्रकोप, बद्धकोष्टता, निद्रानाश इत्यादी आजारांनी मी त्रस्त झालो होतो. इतक्या लहान वयात मी रोज नियमाने औषधे घेत असल्यामुळे माझ्या डॉक्टरांचेही याकडे लक्ष होते. त्यामुळे या आरोग्याच्या तक्रारींवर मात करण्याकरिता शारीरिक योग करण्यासाठी मी प्रोत्साहित झालो. मी नियमितपणे आसने, प्राणायाम इत्यादीचा अभ्यास सुरू केला. हळूहळू त्याचा सुपरिणाम दिसू लागला. माझी शारीरिक प्रकृती सुधारू लागली. शारीरिक योगाची मदत झाली; पण ते तात्पुरतं होतं. मनाच्या स्थायी शांततेसाठी मी प्रयत्नशील होतो. त्या दरम्यान मला ब्रह्माकुमारीज संस्थेचा परिचय मिळाला आणि माझ्या आयुष्यात ज्ञानमार्ग सुरू झाला.

मी शारीरिक योगासोबत राजयोगाचा अभ्यास मनाच्या आरोग्यासाठी सुरू केला. माझे जीवनच बदलू लागले. खऱ्या अर्थाने स्वतःची ओळख पटू लागली. पंचतारांकित हॉटेलमध्ये कामाला असल्यामुळे श्रीमंत तसेच लोकप्रिय व्यक्तींच्या आयुष्यातील काही क्षणांचे, दिखावा आणि प्रदर्शनाचे जवळून दर्शन झाले. आयुष्य असे ऐशोआरामात जगत असूनही अंत:करणात ते सुखी नाहीत हे माझ्या लक्षात आले. मी खऱ्या, कायमस्वरूपी आनंदाच्या शोधात होतो. राजयोगाने ती पोकळी भरून काढली. जसजसा मी राजयोग शिकून त्याचा अभ्यास करत गेलो तसा शारीरिक कर्मेंद्रियांच्या जाणीवेपलीकडे असलेल्या अतींद्रिय सुखाची अनुभूती झाली. मग माझ्या लक्षात आले शरीरस्वास्थ्यासाठी शारीरिक योगासने तर मनासाठी प्राणायाम उपयुक्त ठरतात. मात्र राजयोगाचा नित्य अभ्यास आपल्या आत्म्यासाठी आवश्यक आहे. वर्तमानकाळात बंधनमुक्त जीवनासाठी म्हणजेच मुक्ति आणि जीवनमुक्ती मिळवण्याच्या सर्वोच्च प्राप्तीसाठी राजयोग आत्म्याला शक्तिशाली बनवते. माझ्या जीवनात दोनही प्रकारच्या योगाचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. ज्याला गरज आहे असे मला वाटे त्याला मी शारीरिक योगाविषयी माहिती देत असे; पण ते फारच मर्यादित रूपात होते. त्याकाळी मी अनौपचारिक गप्पांतून सांगत असे.

२०१५ मधे प्रथम आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन झाले. त्यानंतर आता आपले शरीर, मन आणि आत्म्याला संबोधणाऱ्या योगा (आसने, प्राणायाम) व राजयोगाचा समन्वय साधून समाजसेवा करण्यासाठी मला एक मंच मिळाला. आजवर मी अनेक व्यक्तींना याद्वारे मार्गदर्शन केले आहे आणि असे करत राहीन. शारीरिक योगात श्वासावर लक्ष केंद्रित करत मनाची शांतता अनुभवता येते तर राजयोगाच्या अभ्यासात, शरीरालाच विसरायचा अभ्यास शिकवला जातो. आपण शरीर नसून एक चैतन्य आत्मा आहोत याची नुसती माहिती घेऊन उपयोग नसतो, त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे. भृकुटीच्या मध्यावर आपले मन एकाग्र करत हळूहळू आत्म्याच्या मूळ गुणाचे म्हणजे शांतता, प्रेम, पवित्रता इत्यादीचे चिंतन केले तर देहभानापासून मुक्त होण्याचा अनुभव येऊ लागतो. हलकेपणाचा आणि अतिशय गहिऱ्या शांततेचा अनुभव होतो. आपोआपच श्वासाची गती मंदावते, त्यासाठी श्वासावर वेगळे लक्ष केंद्रित करायचीही गरज पडत नाही. नित्य सरावाने, आपले संस्कार बदलायला मदत मिळते हाच माझा स्वानुभव थोडक्यात सांगता येईल.

***



# प्रकाशवाटा
## (भाग – ५)
# अष्ट रत्नांची भेट

दिवंगत ब्र.कु. सुभाष, ज्ञान सरोवर, आबू पर्वत

यांच्या डायरीतून

१९८३ साली बापदादांशी पहिली भेट झाली आणि माझे लौकिक भाऊ तुळशीभाई मला सेवेसाठी दादी शांतामणीजींकडे घेऊन गेले. पण दादीजी म्हणाल्या, ''हा तर खूपच लहान आहे. हा काय सेवा करील?'' मी बाबांच्या कक्षात गेलो, खूपच जड अंतःकरणाने बाबांना मनातल्या सर्व गोष्टी सांगितल्या आणि बाबांची कमाल बघा किती! अगदी दुसऱ्याच दिवशी मुरलीच्या वेळी दादी प्रकाशमणींनी सांगितले, ''मातांचा एक मोठा समूह येत आहे. त्यामुळे ज्या कुणाला सेवेसाठी थांबायचं आहे, त्यांनी थांबावे.'' संध्याकाळी शांतामणी दादींना भेटताना त्यांनी पुन्हा म्हटले, ''हा छोटा (लहान) सुभाष काय सेवा करील?'' एवढ्यात संतोष दीदी आणि प्रभा बेननी म्हटले, ''दादीजी सेवाधारींची खूप आवश्यकता आहे, ह्याला आपण एक पाण्याचा जग देऊ, सर्वांना पाणी देईल तो.'' बाबांनी माझ्या मनातलं ऐकलं. मी खूपच आनंदाने सेवा करू लागलो. त्या दिवसांत आठवड्यातून बाबा तीन वेळा यायचे. त्याचाही खूप फायदा झाला. बघता बघता घरी जायचा दिवस आला. आम्ही दोघं भाऊ ईशू दादी जिथे बसायच्या त्या कार्यालयात बाबांची भंडारी (पैसे) टाकायला गेलो. तिथे एक आश्चर्यकारक दृश्य दिसले. कार्यालयात एका मोठ्या संदलीवर (पलंगावर) अष्ट रत्नांचा एक गट बसलेला होता. त्यात मुख्यतः मनमोहिनी दीदी, प्रकाशमणी दादी, जानकी दादी, गुलजार दादी, चंद्रमणी दादी, मनोहर दादी, निर्मल शांता दादी, शांतामणी दादी, रतनमोहिनी दादी, ईशू दादी ह्या सर्वजणी आपसात गप्पा मारत बसल्या होत्या.

आम्ही दोघं आत जाताच सगळ्या दादी शांत झाल्या. आम्ही दोघं भण्डारी टाकून निघतच होतो तेवढ्यात मनमोहिनी दीदींनी विचारले, ''कुठून आलात?'' भावाने सांगितले, ''साताऱ्याहून, पण मी आसाममध्ये नोकरी करतो.'' भावाने सैनिकांचा पोशाख घातला होता. दादींनी सगळ्या दादींना म्हटले, सॅल्युट (नमस्कार) नाही मारणार? भावाला खूपच आनंद झाला. त्याने सेनेमध्ये जसा सॅल्युट करतात तसाच सगळ्या दादींना सॅल्युट ठोकला. मनमोहिनी दादींनी सॅल्युटचे उत्तर सॅल्युटने दिले. मोठ्या दादींनी प्रेमाने टोली (खाऊ) दिला आणि सारं काही आलबेल आहे, ना हे विचारले. सर्व दादींनी हात हलवून आम्हाला निरोप दिला. परंतु दीदींनी तर आम्हाला खरोखरच शेवटचा निरोप दिला.

त्यानंतर काही दिवसातच दीदी आम्हा सर्वांना सोडून बापदादांच्या कुशीत विसावल्या. ''एवढ्या मोठमोठ्या दादी सर्वजणी मिळून कशा प्रकारे अगदी प्रेमाने राहत ही पण एक शिकण्यासारखी गोष्ट होती.''

***

### ज्ञानबिंदूचे स्पष्टीकरण

ब्रह्माकुमारी संस्थेत दिल्या जाणाऱ्या ज्ञानमार्गात एक शब्द वारंवार येतो तो म्हणजे 'पालना'. याचा मराठीतील अर्थ 'संगोपन' असा आहे. संगोपनाचे. तीन वेगवेगळे अर्थ संदर्भानुसार घ्यावे लागतात. संगोपन म्हणजे १) प्रेम, परमेश्वर पित्याच्या रुपात 'प्रेम' देतो २) सशक्त बनविणे, सद्गुरुच्या रुपात मनुष्यात्म्याला शक्ती प्रदान करतो. ३) योग्य किंवा लायक बनविणे, परमशिक्षकाच्या रुपात शिवपरमातमा 'अगम–निगमाचे' रहस्य भेद करतात. अध्यात्म्याच्या दृष्टीने 'संगोपनाचा' हाच व्यापक अर्थ घेता येईल.



# ट्रस्टी म्हणजे काय?

ब्र.कु. माधुरी, ठाणे

किती हलका करणारा शब्द आहे ट्रस्टी. शिवबाबा ज्ञान मुरलीत नेहमीच सांगत असतात की, ट्रस्टी होऊन सर्व सांभाळा, परंतु ट्रस्टीचा कितीतरी गहन अर्थ शिवबाबा मुरलीद्वारे सांगतात.

प्रथम ट्रस्टी म्हणजे काय? तर अगदी सोपं माझं ते सर्व तुझं म्हणजेच शिवबाबांचे; पण हे फक्त बोलण्यापुरते नसून प्रत्यक्ष जीवनात हे ज्ञान धारण केले तर धारण करणाऱ्या व्यक्तीएवढे भाग्यशाली जगात कोणी नाही. माझं माझं म्हणत आपण अनेक बंधतात व ओझ्याखाली अडकून पडतो. परंतु परमात्मा सहज सोपे सांगतात ट्रस्टी म्हणजे निमित्तमात्र बना. हे परमात्मा शिवबाबाच सांगू शकतात कारण परमात्माच आपले विकारी संस्कार, वाईट वृत्ती यांच्या सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. माझे तन, मन, धन, श्वास, संकल्प सर्व परमात्म्याचे मग काय ! आहे की नाही सर्वात सोपी युक्ती ! भक्तीत आपण म्हणत होतो – माझे मी पण गळो देवा. आता तेच कर्मात उतरवायचे आहे.

आपण ब्रह्माबाबांचे उदाहरण घेऊ. ब्रह्मा बाबांनी स्वत: संसारी असतांना सुद्धा सर्व काही करून ते ट्रस्टी निमित्त झाले. त्याचप्रमाणे आपल्या मोठ्या दादी दीदी यांचीही उदाहरणे, अनुभव आपण ऐकतो व बघितलेही आहेत. आपल्याकडे जे काही आहे अगदी स्थूल, सूक्ष्म, धन, संपत्ती, वैशिष्ट्ये तन, मन, सर्व काही शिवबाबांचे असा निश्चय आपण जेव्हा करतो व सर्व काही निमित्त बनून सांभाळतो तेव्हा त्याचे अनेक फायदे होत असतात.

आपण भक्ती मार्गातही ऐकलेले, वाचलेले आहे की, संतांनी – भक्तांनी सर्व प्रभूचे म्हणत निमित्त मात्र जीवन जगले. उदा जनाबाईंना हरिने केलेली मदत, संत गोरा कुंभार यांचे बाळ चिखलातून विठ्ठलाने वाचवले. जे आहे ते परमेश्वराचे तो सांभाळेल मला फक्त त्याच्या आठवणीत राहायचे ह्या निश्चयाची ही उदाहरणे नाही का ! आता तर प्रत्यक्ष परमात्मा आपणास ब्रह्मा तनाच्या आधारे सन्मुख येऊन ज्ञान देत आहेत. तर आपण त्या ज्ञानाची धारणा अनुभवापासून व प्राप्तीपासून दूर का राहायचे!

निमित्त वा ट्रस्टी समजून कर्म केल्याने आत्म्यास हलकेपणाचा अनुभव येतो. पण निमित्त वा ट्रस्टी याचा अर्थ असा नाही की सर्व परमात्मा करेल आपण कोणताच पुरुषार्थ वा कर्म करायचे नाही. असे नाही तर, आपण जे कर्म करू, जो पुरुषार्थ करू तो परमात्म्याच्या आठवणीत पण निमित्त आहोत या भावनेने करायचे. हा विधी आहे ट्रस्टी बनण्याचा सगळे काही परमात्म्याचे जेव्हा आपण बुद्धित ठेवतो की, आपले पालन-पोषण हे परमात्मा करत आहेत, योगक्षेमं, वहाम्यहम्. जरी आपण कमवित असू तरी ते आपण परमात्मा यांच्या आठवणीत कर्म केल्याने धनही पवित्र होते व ती शिव बाबांचीच पूंजी व भंडारा (स्वयंपाक घर) आहे हा भाव हवा. यातूनच एकानॉमी निर्माण होते. हे केवळ बोलणे व ऐकण्यापुरते नाही तर माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. मी आज २७ वर्ष झाले अनुभवते की आपण ट्रस्टी होऊन सगळे सांभाळले तर मनाने, बुद्धीने व शरीराने खूप हलके राहतो व बाबांचीही पावलोपावली मदत मिळते. आपण बाबांच्या श्रीमतानुसार जर प्रत्येक कर्म केले तर त्यात बाबांची जबाबदारी असते व आपण हलके होतो. ट्रस्टीपणामुळे साक्षीभाव वाढीस लागून ममत्व कमी होते. देहअभिमान व देहअहंकार यापासूनही आत्मा विलग होतो व एक सुखद संतुष्टी व शांतीचा अनुभव करतो. विश्व नाटकाचे ज्ञान परमात्माच देतात. त्याचाही फायदा होतो.

तर काय मग तुम्हीही अनुभव कराल ना माझ्या प्रियआत्मन् बंधु-भगिनींनो. पण यासाठी मात्र तुम्हांला परमात्मा काय ज्ञान देतात ते समजून घेऊन पुढे रोज ज्ञान मुरली म्हणजे परमात्म्याचे श्रीमतरूपी महावाक्य यांचा अभ्यास करावा लागेल. बघा अनुभव घेऊन मी सांगण्यापेक्षा तुम्हीही त्या सुगंधाचा अनुभव घ्या व मनाने, बुद्धीने हलके व्हा ! हीच सर्वांप्रति शुभभावना व शुभकामना!

***

# पवित्र धन आणि अर्थव्यवस्था

दिवंगत भ्राता ब्र.कु. रमेश, मुंबई

ज्ञान सागर परमप्रिय शिवबाबा आपल्या ब्रह्मावत्सांना ज्ञान योगाचे शिक्षण देऊन सत्ययुगी दैवी सृष्टिची स्थापना करत आहेत. वेगवेगळ्या धर्मांमधे, विविध व्यक्तींनी सत्ययुगाचे वर्णन अनेक प्रकारे, वेगवेगळ्या शब्दांत केले आहे. उदा. तेथील देव देवतांचे संस्कार आणि त्यांच्या व्यवहारामुळे असे म्हटले जाते की ते सर्वगुणसंपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, अहिंसा परमोधर्म अशा प्रवृत्तीचे असतात. जिथे सिंह आणि गाय एकाच काठावर पाणी पितात असे तेथील अहिंसेच्या परमोच्चतेचे वर्णन केले जाते. सत्ययुगातील राजधानी सत्याच्या आधारावर चालते म्हणून तिथे सत्ताधीश, प्रजेला खोटी वचने देत नाहीत. तिथे राजा व प्रजा दोघेही संपन्न आणि सत्यनिष्ठ असतात. तेथील सर्व कारभार हा खरेपणावर चालतो म्हणून त्याला सत्ययुगाची उपाधी दिली जाते.

सत्ययुगात एक विश्व महाराजा आणि विश्व महाराणी असतील, तसेच अनेक छोटी छोटी राज्ये असतील. ते राजेदेखील त्यांना मदत करतील. निश्चितच ती सर्व राज्येसुद्धा आर्थिक बाबतीत संपन्न असतील. सध्याच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये जशा अनेक प्रकारच्या समस्या असतात, तशा तिथे नसतील.

शिवबाबा आणि ब्रह्माबाबांनी आपल्याला अर्थव्यवस्था शिकवली आहे त्या आधारे जी ईश्वरी सेवा होते, ती आपण ब्रह्मावत्स आपल्या तन-मन-धनाने करतो. आपण कोणाकडून कर्ज घेऊन ईश्वरी सेवा करत नाही. वर्तमानकाळी कर्ज घेणं म्हणजे भविष्यातील प्रजेला वर्तमानातील खर्चाच्या बंधनात बांधणं. त्यांच्या उत्कर्षाला, प्रगतीला आळा घालणं. आपण आपल्याच तन-मन-धनाचा वापर करून ईश्वरी सेवा करतो ज्यायोगे तो आत्म्याचा संस्कार बनतो. त्यामुळे सत्ययुगातील महाराजे आपल्या तन-मन-धनाने प्रजेची सेवा करतात. तिथे राजा प्रजेचे पालनपोषण करण्यासाठी त्यांच्याचकडून कराच्या रूपात धन घेणार नाही. प्रजाजन आपले कर्तव्य समजून घेऊन राज्य कारभार चालविण्यासाठी मदत करतात. सांप्रत समयीदेखील शिवबाबांनी दिलेल्या श्रीमताच्या आधारावर हेच घडत आहे. कोणत्याही सेवाकेंद्राची अर्थव्यवस्था कर्जावर आधारीत नाही. जगात अशा कित्येक संस्था आहेत, ज्या कर्जाच्या रूपात पैसा घेऊन व्यवहार करतात. काहीजण कर्जाऊ रक्कम न घेता लोकांकडून दान तसेच अनुदानाच्या रूपात धन स्वीकारून खर्च करतात. त्यामुळे तिथे दान देणारा व दान घेणारा असा संबंध असतो. दान देणाऱ्या व्यक्तींच्या काही इच्छा, आकांक्षासुद्धा असतात म्हणूनच ते दान स्वीकारणाऱ्या व्यक्तींना त्या इच्छा पूर्ण होतील हे पहावे लागते.

पैशाचा हिशोब कसा लिहावा याविषयी आम्ही जेव्हा अव्यक्त बापदादांशी चर्चा करत होतो तेव्हा त्यांना 'दान' हा शब्द आवडला नसल्याचं मला आठवतंय. शिवबाबा हे विश्वात सर्वोच्च, सर्वांचे पालनकर्ते, श्रेष्ठ पदाची प्राप्ती करविणारे आहेत. ते आपल्या मुलांकडून दान कसं घेतील! इथे तर शिवबाबांची मुले आपलं भाग्य बनविण्यासाठी शिवबाबांकडे धन जमा करतात. समजा बँकेत कोणी आपल्या स्वत:च्या खात्यात रक्कम जमा केली तर, ती त्याने बँकेला दान केली असा त्याचा अर्थ होत नाही ना. म्हणून बाबांनी व्यक्तिगत कोणाकडून धनाची मदत घेण्याऐवजी 'भंडारी' (पेटी) ठेऊन त्यात सहयोग रक्कम घालण्याची प्रथा रूढ केली. त्याला दान असे न म्हणता 'ऐच्छिक सहयोग' (Voluntary Contribution) असे नाव दिले. अशा प्रकारे भंडारीद्वारे मदत प्राप्त करण्याच्या प्रथेमुळे, देणारे व घेणारे किंवा लहान - मोठे अशी भावना उरत नाही. जगात दान

देणाऱ्यांना ते दिल्याचा अहंकार असू शकतो, इथे तोदेखील असत नाही. त्याचा परिणाम म्हणून या दैवी कुटुंबात एक विशिष्ट, निराळा एकोपा असतो. त्या एकोप्यामुळे आपण अनेक प्रकारच्या मतभेदांपासून मुक्त राहतो, त्यायोगे सेवेतही प्रगती होते व पारस्पारिक प्रेमही राहते.

सांप्रत काळी सगळ्या देशांच्या शासनव्यवस्थेला युद्धाच्या भयगंडाने ग्रासले आहे. जो तो आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी शस्त्रास्त्रे जमा करत आहे. याउलट सत्ययुगाची अर्थनीती 'सर्वोदय (सर्वांचे कल्याण) आणि सर्वांची प्रगती' यावर आधारीत आहे. तिथे कोणालाही कोणापासून भय नसेल. एकदा भारताचे तत्कालीन राष्ट्रपती ज्ञानी झैलसिंग आणि काही पदाधिकारी मधुबनला भेट देण्यासाठी आले असता त्यांच्याबरोबर मोठया प्रमाणावर सुरक्षारक्षकही आले होते. सत्ययुगात जरी विश्व महाराजा व महाराणीबरोबर श्रद्धाभावनेने अनेकजण राहात असले तरी तिथे अशा सुरक्षाव्यवस्थेची आवश्यकता नसते.

वर्तमानकाळातील अर्थव्यवस्थेमध्ये दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या बंधू भगिनींना जीवनावश्यक बाबी पुरवण्यासाठी सरकार त्यांना काही सवलती देते. उदा. रेशनच्या दुकानांतून धान्य, साखर इत्यादी गोष्टी कमी किमतीत उपलब्ध करून दिल्या जातात. सामान्य परिस्थितीतील नागरिकांनासुद्धा काही महाग वस्तू उपलब्ध व्हाव्यात म्हणून आर्थिक अनुदान वगैरे दिले जाते. सध्या भूगर्भातून मिळणारे उर्जास्रोत कमी होत आहेत म्हणून सरकार सौरउर्जेवर चालणाऱ्या उपकरणांचा अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. अशा उपकरणांवर विशेष सूट म्हणून अनुदानही दिले जाते. सत्ययुगात कुणीही गरीब व्यक्ती नसते त्यामुळे तिथे कोणालाही असे अनुदान देण्याची आवश्यकता नसेल. प्रत्येक आत्मा संपन्न व संतुष्ट असल्यामुळे तिथे दारिद्र्य रेषा वगैरे नसतेच.

सत्ययुगी अर्थव्यवस्थेमध्ये निवृत्तीवेतनचा खर्च नसेल. सध्याच्या माणसांची कार्यक्षमता पाहता ५८/६० वयानंतर शरीर हळूहळू थकायला लागतं, त्यामुळे कर्मचारी निवृत्त होतात. उर्वरित आयुष्यात उदरनिर्वाहासाठी त्यांना निवृत्तीवेतन मिळते. वर्तमानकाळी माणसाची आयुर्मर्यादा ७५/८० आहे, म्हणजेच अधिकात अधिक २० वर्ष त्याला निवृत्तीवेतन मिळते. याउलट सत्ययुगात सरासरी वयोमान १५० वर्ष असते. तसेच तिथे आत्मा आणि प्रकृती दोन्ही सतोप्रधान असल्यामुळे कर्मेंद्रिये कधीही थकत नाहीत, म्हणून मग सेवानिवृत्ती व निवृत्तीवेतनचा प्रश्नच नाही. कल्पना करा जर तिथेही लोक ६० व्या वर्षी निवृत्त झाले तर पूर्ण समाजच अशा व्यक्तींचा असेल. खरंतर सत्ययुगात सेवानिवृत्ती असेल की नाही हा रंजक प्रश्न आहे.

माउंट आबू येथे नक्की लेकच्या जवळ आध्यात्मिक संग्रहालय बनत होते तेव्हाची गोष्ट. तिथे सत्ययुगातील व्यवस्था कशी दाखवावी यासंदर्भात अव्यक्त बापदादांना विचारण्यात आले. सत्ययुगातील प्रथम श्री लक्ष्मी-नारायण आपले उत्तराधिकारी द्वितीय श्री लक्ष्मी-नारायण यांना राज्य सिंहासनावर कसे बसवतात ते दृश्य मॉडेल स्वरूपात दाखवावे असा बापदादांनी संदेश दिला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे सत्ययुगात आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कारभार करत नाहीत. विश्व महाराजा स्वतः:च आपल्या उत्तराधिकाऱ्याला राजगादीवर बसवून, राज्यकारभार करण्याचे अनेक पैलू समजावून सांगतील. आजही आपण म्हणतो की आई हाच आपला सर्वात चांगला प्रथम गुरू असते. सत्ययुगातही आई-वडीलच आपल्या मुलांना सर्वोत्तम शिक्षण देतील हे यावरून सिद्ध होते. त्यासाठी इतरत्र कुठेही जाण्याची आवश्यकता नसेल.

आज जगात अनेक देश दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल करत आहेत. आंतर्राष्ट्रीय स्तरावर मोठमोठ्या रकमांचे कर्ज घेतलेल्या या देशांची अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. सत्ययुगातील अर्थव्यवस्थेमध्ये विश्व महाराजा अशा प्रकारे कर्जाच्या जाळ्यात कधीच अडकणार नाही हे सत्य आहे. सत्ययुगातील आणि कलियुगातील अर्थव्यवस्थेमध्ये हाच मूलभूत फरक आहे. प्रिय शिवबाबा म्हणतात त्याप्रमाणे दोन्हीत दिवस रात्रीचे अंतर आहे. अशा आगामी सत्ययुगाची आपण तयारी करत आहोत स्वपरिवर्तनाद्वारे. स्थूल रूपातील धनाच्या नियोजनाबरोबर मनातील संकल्परूपी धनाचे नियोजनही महत्त्वाचे आहे.

**(अनुवाद : ब्र.कु. मिनल)**

***




# प्रश्नोत्तरे

## (भाग ३)

## शीर्षासन करणाऱ्या बुवांचा प्रश्न

ब्र.कु. सूरज, आबू रोड

**प्रश्न :** ॐ या अक्षरात ३ देवता आहेत एक ब्रह्मा, दूसरा विष्णू आणि तिसरा शंकर पण त्यावर अर्धचंद्र काढून मध्ये एक छोटा ठिपका काढतात ह्याचा म्हणजे ह्या अर्धचंद्र आणि ठिपक्याचा अर्थ काय?


**सूरजभाई :** मी ह्यासाठी एक छोटासा किस्सा सांगू इच्छितो, तो नक्कीच ह्या प्रश्नाचे उत्तर द्यायला सोपे करेल. माझा जन्म आर्य समाजातील कुटुंबात झाला असल्याने एकदा मी इथून (मधुबन, मा.आबू) माझ्या लौकिक गावी गेलो होतो. आमच्याच कुटुंबातील एक सदस्य होते, आम्ही त्यांना बाबाजी म्हणायचो ते एकदम पक्के (कट्टर) आर्यसमाजी होते. आणि त्यांची इतकी जबरदस्त प्रॅक्टीस (सराव) होती की, ते १ तास सलग शीर्षासन करायचे, कुठलाही आधार न घेता, तेही शेतात. सगळे त्यांना हसून म्हणायचे अहो, एक तास अस शीर्षासन केलं तर सगळा रक्तप्रवाह डोक्याकडे, मेंदूत जाऊन तुम्हाला त्याचा त्रास होईल - पण बाबा मात्र मस्तमौला होते. त्यांची तब्येतही एकदम छान होती.

मी दिसताच ते माझ्याकडे येऊन म्हणाले, 'मुला माझा एक प्रश्न आहे त्याचं जरा उत्तर दे बघ 'मी म्हटलं', विचारा बाबा, काय विचारायचं ते. मी नक्की उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. 'ते म्हणाले', 'अरे मी कित्येक लोकांना विचारलं, मोठेमोठे विद्वान, पंडित, आचार्य, संन्यासी - सगळे झाले, पण माझ्या ह्या छोट्या प्रश्नाच समाधानकारक उत्तर कुणीच देऊ शकलं नाही. असे म्हणून त्यांनी वरील प्रश्न विचारला- आता सांग बरं - मी म्हटलं, अहो हे तर खूपच सोपं आहे. 'बघा हं ब्रह्मा, विष्णू, शंकर ह्या तिघांचे मिळून हे अक्षर आहे - म्हणतात नं आकार तो ब्रह्मा, मकार तो विष्णू, मकार महेश - हे तर सर्वश्रूत आहे. जसं आत्ताच तुम्ही म्हणालात. बाबा ह्या तिन्ही देवतांना घडवणारा निर्माण करणारा तो निराकार परमपिता परमात्मा त्याचीच हा बिन्दू (ठिपका) आठवण आहे बरं का !

माझ्या ह्या अचूक उत्तराने बुआ तर एकदम खुशीत आले आणि सगळ्या गावात सांगत सुटले की ब्रह्माकुमार बने अपने गाव के बच्चे ने देखो मेरे कठिन सवाल का कैसे जवाब दिया । वास्तवात सर्व देवी देवतांचा निर्माता एक निराकार परमपिता परमात्मा शिव आहे. भक्तीत ही म्हणतातच न ब्रह्मा देवताय नमः विष्णू देवताय नमः, शंकर देवताय नमः पण नंतर म्हणतात शिव परमात्माय नमः । तर ह्याचा अर्थ असा की शिव परमात्मा ज्याला परब्रह्म ही म्हणतात, तोच सर्वांचा निर्माता आहे. त्याच्याशी जर आपण योग म्हणजेच संबंध प्रस्थापित करून त्याची निरंतर आठवण केली, तर आपणही देवी देवतांसारखे बनू. त्यासाठीच शिवाची फक्त पूजा नाही करायची. तर त्याची आठवण करून देव-देवतांसारखे आपणही बनू शकतो. शिवबाबांकडून आपण दैवी मर्यादा शिकू शकतो. शक्ती, गुण ह्यांची प्राप्ती करू शकतो. आणि ह्या सर्व सूक्ष्म प्राप्तींसाठी आपल्याला ध्यान धारणेची अत्यंत आवश्यकता आहे. आपण 'त्यांची आठवण केली, तर 'ते' ही आपल्याला हा सर्व खजिना देऊ करतात. हिंदीत म्हणतात - 'याद से याद मिलती है ।

आपणही ब्रह्माकुमारीचा हा ध्यानयोग शिकण्यासाठी आणि शास्त्रातील, भक्तीमार्गातील अनेक गोष्टींची तथ्ये जाणून घेण्यासाठी, तसेच सणासुदींचे महत्त्व, देव देवता, कोण होते? भारतात कधी स्वर्ग होता? भारताला सोन्याची चिडियाँ का म्हणतात? आपण कोण आहोत? कुठून आलो आहोत? आपलं घर कुठे आहे? विश्वाचीं भविष्य काय? पुढे काय होणार - हे आणि ह्यांसारखे असे अनेक प्रश्न

(पृष्ठ क्र.२७ वर)



# रजनीदीदींशी मनमोकळ्या गप्पा

ब्र.कु. रेश्मिता, टोकियो

रजनी दीदींचा परिचय – दीदी ८ वर्षांच्या होत्या, तेव्हापासूनच ज्ञानमार्गावर चालत आहेत. मागील ४५ वर्षांपासून त्या समर्पित जीवन जगत आहेत. त्यांनी अनेक देशांत सेवा केलेली आहे. उदा. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि सध्या त्या जपान देशात बाबांची सेवा करत आहेत.

**प्रश्न :** दीदी तुम्हांला मला विचारायचयं की तिथे लोकांची श्रद्धा (आस्था) देवावरचा विश्वास कसा आहे? तिथल्या लोकांची विचारधारा कशा प्रकारची आहे ? ब्रह्माकुमारीजबद्दल त्यांचे विचार कसे आहेत? ह्या संस्थेचे विचार त्यांना पटतात का? तुम्हाला त्यांच्या वेगळ्या विचारधारणीमुळे काही समस्यां आल्या का?

**उत्तर :** ओम्–शांती. तसं पाहायला गेले, तर मी खूप वर्षांपासून जपानला राहतेय. जपानमध्ये आपले हिरोशिमा, टोकियो, कोबे, ओसाका ह्या शहरांत (ठिकाणी) ब्रह्माकुमारीजची सेवाकेन्द्रे आहेत आणि तुम्हाला सांगू इच्छिते जपानी लोकांना भारताविषयी फार जिव्हाळा आहे. आदर आहे. भारताचे जपानशी संबंध खूप चांगले आहेत. भारताबद्दल अनेक गोष्टींबद्दल जाणून घेण्यास ते नेहमीच उत्सुक असतात. म्हणूनच भारताचा प्राचीन योग शिकायला त्यांना फार आवडतं.

जपान मध्ये खूप हठयोग वर्ग (शाळा) चालतात. जे लोक ब्रह्माकुमारी सेंटरवर येतात, ते सर्वजण राजयोग शिकतात. ब्रह्माकुमारीजचा राजयोग शिकण्यामागचे त्यांचे कारण म्हणजे त्यांची जीवनपद्धती खूप ताणतणावाची आहे. घरचं काम, नोकरी, रोजच्या गरजा पूर्ण करणे ह्या सर्वांचाच अगदी छोट्या छोट्या गोष्टींचाही ते फार ताण घेतात. त्यामुळे त्यांचं मन फार सैरभर असतं. खूप कोंडमारा होत असतो. म्हणून मनाच्या शांतीसाठी त्यांना राजयोग आत्मसात करायचा असतो. हेच त्यांचं उद्दीष्ट असते. तसे ते हठयोग शिकलेलेच असतात. त्यामुळे त्यांना योग हा शब्द माहीतच असतो. तर आपण जाणतोच योगाचा अर्थच आहे – नातेसंबंध जोडणे. जपान बौद्ध धर्माचा देश असल्याने ते देवाला, ईश्वराला मानत नाहीत. पण असं आहे की, तिथले लोक, परमात्म्याचे तरंग – शांती, सुख, प्रेम, आनंद, पवित्रता, ज्ञान, शक्ती – ज्याला आपण प्रकंपन म्हणतो. ते अनुभवतात तेव्हाच ते ह्या गोष्टीवर विश्वास ठेवतात की परमेश्वर खरंच अस्तित्त्वात आहे. (बौद्ध धर्माच्या शिकवणुकीनुसार ते कर्म–काम हीच पूजा आहे असे मानतात.)

पण जे लोक सेवाकेन्द्रावर येतात त्यांचं मुख्य उद्दीष्ट असते ताण–तणावापासून मुक्ती. या कारणासाठीच ते ध्यानधारणा (राजयोग) शिकतात. दुसरे असे की, दुसऱ्या महायुद्धानंतर तेथील लोकांची जीवनशैली खूप बदलली. ते लोक अति काम (श्रम) करतात, कामाचं व्यसनंच म्हणा नं! तर दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जे हिरोशिमा – नागासकीवर बॉम्ब हल्ला केला होता. त्यातही शहरं आणि पर्यायाने पूर्ण देशच कोलमडून गेला होता. त्यामुळे देशाला पूर्ववत स्थितीत आणण्यासाठी खूप काम करून पैसाही जमा करायचा होता त्यांना – नोकरी करणाऱ्यांना तसाही वेळ मिळतच नाही. तर त्यामुळे कुटुंब व्यवस्था पूर्णपणे ढासळली आणि कौटुंबिक जिव्हाळा नष्ट झाला.

ब्रह्माकुमारीजचा हा सिद्धांतच आहे – हे विश्वची माझे घर, वैश्विक कुटुंब प्रणाली परमेश्वर आमचा पिता आणि आम्ही सर्व भाऊ–बहिणी त्याची लाडकी लेकरे)

खरे कौटुंबिक प्रेम आपण सर्वांना वाटतो, एकमेकांना

सुख-दुःख वाटतो, मनाच्या गोष्टी सांगतो - ते कौटुंबिक सुख, प्रेम त्यांना ब्रह्माकुमारीजमध्ये मिळते.

तिसरा मुद्दा म्हणजे इथे अतिशय शुद्ध पवित्र वातावरण असते. सकारात्मक प्रकंपन असतात, ते ध्यानाला बसतात, तेव्हा मनाने निर्वाणापर्यंत पोचतातच, म्हणजे शांती मिळते त्यांना. पण परमेश्वराशी संबंध कसा प्रस्थापित करायचा, सुखाची अनुभूती कशी करायची हे आम्ही त्यांना शिकवतो. जसे मी तुम्हाला आधीच सांगितलं की - एखादे चित्र हातात घेऊन त्यांना सांगितलं, की हा परमेश्वर आहे, तर ते त्यांना अजिबात पटणार नाही. जोपर्यंत ईश्वराच्या शक्तीचे प्रकंपन जाणवणार नाहीत, तसेच आपली वृत्ती, वाणी, यात बदल जाणवणार नाही, तोपर्यंत त्यांना ह्या गोष्टी गौण वाटत राहतात. कारण ह्या देशाचे वातावरण वैज्ञानिक सत्यावर आधारित असल्याने, प्रत्येक गोष्टीमागचे वैज्ञानिक कारण ते शोधतात, आणि प्रत्यक्ष प्रमाण मिळेपर्यंत ते त्याचा पाठपुरावा करतात. तर अशाप्रकारे तिथे आमची सेवा होत असते.

याचप्रमाणे लहान मुलांचीही सेवा होते, माता-भगिनींचीही आम्ही सेवा करतो. तसेच तिथे हठयोगाच्या खूप शाळा (केन्द्रे) आहेत, त्यांच्याशी संपर्क साधून आम्ही राजयोगाचा प्रचार-प्रसार करतो. हल्लीच आमच्याकडे एक सज्जन आले होते. इमोतो सान नावाचे - त्यांनी पाण्यावर प्रयोग केलाय हे आपण जाणतोच म्हणजे पाहा हं - पाण्याकडे बघून आपण काही बोललो, सकारात्मक अथवा नकारात्मक, तर त्याचील स्फटिकात बदल घडतो. म्हणजे जर आपण त्याच्याकडे बघून म्हटलं 'आय लव्ह यू' तर पाण्यातील स्फटिकरचना विशिष्ट प्रकारची होते आणि जर आपण म्हटले की, 'आय हेट यू' तर तेच पाणी स्फटिकरचना बदलल्याने नकारात्मक होते. ह्या सद्गृहस्थाने वैज्ञानिक संशोधन करून पाण्यावर आपल्या विचारांचा कसा प्रभाव पडतो, हे आम्हांला दाखवले.

ब्रह्माकुमारीज सेवाकेंद्रावरही तीर्थ म्हणजे आपण समोर पाणी ठेवतो - पाण्यावर आपल्या शुद्ध विचारांचा जो प्रभाव पडतो, - असे हे पाणी ते लोक आपल्या क्लिनिक मध्ये घेऊन जातात आणि तपासतात, तेव्हा त्यांना दिसून येते की राजयोगाच्या अभ्यासाने पाण्यावर सुंदर संस्कार झालेत. कारण आपल्या शरीरातही मोठ्या प्रमाणात पाण्याचा सहभाग आहे, तर विचार करा आपल्याला किती सकारात्मक विचार करायला हवा ! परिणामी आपले शरीर देखील निरोगी राहील अशाप्रकारे तिथे वैज्ञानिक सत्यावरच विश्वास ठेवणारे लोकं खूप आहेत.

आता हे असे वैज्ञानिक संशोधक लोक आले होते ब्रह्माकुमारीजच्या मा. आबू येथील मुख्यालयात. तेव्हा त्यांनी राजयोग ध्यानधारणेचा अनुभव घेतला.

**प्रश्न : राजयोग साधना का सर्वश्रेष्ठ आहे ?**

**उत्तर :** कारण हे फक्त पाण्यालाच शुद्ध पवित्र करत नाही, तर ह्या जगाचे समस्त विश्वात सकारात्मक ऊर्जा प्रसारित करते. वातावरण जर परिवर्तित करायचे असेल, तर हा राजयोग - म्हणजेच परमात्म पित्याशी थेट संबंध जोडतो. परमात्म शक्तीनेच हे सहज साध्य होऊ शकते. आबूस गेलेल्या वैज्ञानिक लोकांना ही गोष्ट फार फार आवडली. वैज्ञानिकांनाही आता आतून खूप इच्छा आहे की, आता असे काही रिसर्च करावे, - की राजयोग ध्यानधारणेद्वारे सारे जग कशाप्रकारे परिवर्तित करता येईल - तर ह्या रिसर्च संशोधनाचा एक गट बनला आहे.

एक फिल्ममेकर आहे, त्यांनीही एक फिल्म /चित्रपट बनवला आहे - prayer meditation नावाचा, तेही मा.आबू ला गेले होते. त्यांनीही आपला हा अनुभव सांगितला आहे की ह्या राजयोगा ध्यानधारणेमुळे कशाप्रकारे त्यांच्या मेंदूतील गाठ बरी झाली. त्यामुळे त्यांनीही हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध केलं आहे की, आपण जे सकारात्मक विचार करतो, ध्यानधारणा करतो प्रार्थना करतो, परमेश्वराचे स्मरण करतो - ह्या सर्वांमुळे आपल्या शरीरावर (सकारात्मक) चांगला परिणाम होतो. त्याचबरोबर आपल्या जीनस्वर देखील परिणाम होतो. त्यांनी हे सर्व वैज्ञानिकांना सिद्ध करून चित्रपट केला आहे - हा चित्रपट ते aweaking TV (Channel) वर दाखवतील. ह्याचे काम चालू आहे - यथावकाश तो सर्वांना बघता येईल.

तर अशाप्रकारे आम्ही जेव्हा त्यांना सांगतो की, कसे आपले मनातील विचार आपल्यावर प्रभाव टाकतात - आम्ही हे वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध करतो तेव्हा ते सर्वजण होकार दर्शवतात तसे पाहिले तर खूप लोक येतात. त्यात जपानी लोकही आहेत. जपानी लोकच सेवाकेन्द्राचे संचालन करतात. जिथे दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने बॉम्ब

(पृष्ठ क्र.२८ वर)



# पसायदान

(भाग – ३)

ब्र.कु. ज्ञानेश्वर, पुणे


पसायदान म्हणजे काय आहे? माउलींनी म्हणजे ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाकडे, भगवंताकडे मागितलेले मागणं आहे. सुरुवातीला जेव्हा मी वाचले, विचार मंथन केले, त्यासाठी फक्त तीन मिनिटे लागली. गहनतेमध्ये जाऊन, सखोल जाऊन त्याचा अर्थ समजायचा असेल, तर तीन मिनिटात होऊ शकत नाही. परंतु जसे जसे मला राजयोगाचे ज्ञान मिळाले आणि मी त्या ज्ञानाचे चिंतन करू लागलो, तसे तसे पसायदानावर चिंतन करण्यासाठी दिशा मिळाली. मला नंतर असे लक्षात आले की माउलींनी जे पसायदान मागितले आहे ते या धरतीवर स्वर्ग आणण्यासाठी मागितले आहे. कामना, इच्छा, विनंती आहे ते या धर्तीवर स्वर्ग आणण्यासाठी. परंतु धरतीवर स्वर्ग आणणे म्हणजे काय? आपण बोलतो हे स्वर्गसुख आहे, स्वर्गात जाणे. एक अशी गोष्ट आहे जेथे दुःखाची छाया, कल्पना किंवा दूरपर्यंत विचार नाही. परंतु जेव्हा कोणी स्वर्गात जाते म्हणजे स्वर्गवासी होते तेव्हा आपण रडतो, परंतु आपण हसायला पाहिजे. कारण तो स्वर्गात जात आहे अशी कल्पना आहे. परंतु कोणीतरी असे सांगितले आहे की हे दुःख वियोगासाठी असते.

हा स्वर्ग, जन्नत आपण म्हणतो तो इतका सुंदर सुखदायी आहे. ही कल्पना प्रथम कुठेतरी असणार, म्हणून तर आपण मानतो. मला असे वाटते की हा स्वर्ग प्रथम या धरतीवर असणार आणि या भारतात होता. ज्ञानेश्वर माउली म्हणतात, 'जे खळांचे व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो.' म्हणजे माणसातील दुर्गुण जावोत. सद्गुण विकसित होवोत. असा उन्नत मानव सृष्टीवर कर्म करू लागला तर तो स्वर्गच नव्हे काय? ही काही अशीच बिनाआधार कल्पना नाही. स्वर्ग या धरतीवर आणण्याची माउलींची कल्पना आणि वर्णन पसायदान मध्ये आहे. याच स्वर्गाला आपण रामराज्य पण म्हणतो. राम राज्य गांधीजींच्या मनातले. आता हे रामराज्य पाहिजे त्यात आपल्याला काय अभिप्रेत आहे? या राम राज्यात रावण आहे? मारीच आहे? लक्ष्मण आहे का? आणि सीतेला पळवून नेण्याचा संकल्प आहे का? रामाचा वनवास आहे का?जर रामराज्य पाहिजे तर आपल्याला ह्या सर्व गोष्टी त्याच्यामध्ये अपेक्षित आहेत का? की असेच आपण रामराज्यासाठी विचार केला आहे. आम्हाला रामराज्य पाहिजे असे म्हणतो परंतु या गोष्टीवर आपण चिंतन विचार मंथन करीत नाही. आणि चिंतन करतो तेव्हा आपण कुठे चूक तर करीत नाही? जर आपल्या स्वप्नातील रामराज्य पाहिजे, तर मला नाही वाटते की आपण त्यात रावणाची अपेक्षा करतो. राम राज्य म्हणजे आदर्श राज्य, राजा. आणि नेहमी आदर्श म्हणजे शंभर टक्के परफेक्शन. आणि हे परफेक्शन म्हणजे पुरुषोत्तम राज्य म्हणजेच रामराज्य. आणि हे परफेक्शन एकेकाळी भारतातच होते म्हणूनच भारताला 'सोनेकी चिडिया' म्हणायचे. खूप खूप वर्षांपूर्वी तेथे एक राजा होता हे जे मी ऐकायचो, तेव्हा वाटायचे खूप खूप वर्षांपूर्वी म्हणजे किती पुरातन? आणि हे जे पुरातन राज्य होते त्या राज्याचे राजा राणी लक्ष्मीनारायण होते. म्हणजेच लक्ष्मीनारायणाचे राज्य होते. आणि त्यालाच स्वर्ग म्हणायचो आणि हा स्वर्ग कसा असायला हवा याचेच वर्णन, दृश्यरूप माउलींनी पसायदानात केले आहे. त्यांची दूरदृष्टी किती श्रेष्ठ होती हे समजते. पसायदान म्हणजे रोड मॅप आहे स्वर्गाचा. त्यावर चर्चा व्हायला हवी. आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। तोषोनी मज द्यावे। पसायदान हे।।

या विश्वात्मक देवाला माउली सांगतात हे जे मी आतापर्यंत ज्ञानेश्वरीचा वाङ्‌यज्ञ केला त्यावर आपण संतुष्ट व्हावे, आणि संतुष्ट होऊन मला असे वरदान द्यावे. आणि हे वरदान कसे असावे याचे वर्णन म्हणजे पसायदान.

तर पुढील ओवीचे चर्चा, चिंतन पुढील भागात तोपर्यंत क्षणभर स्वल्पविराम.

***



# कमकुवत संस्कारांचे परिवर्तन

ब्र.कु. भगवान, शांतिवन

प्रत्येकामध्ये काही ना काही कमतरता असतात. त्या जीवनामध्ये अधूनमधून विघ्नरूप बनून पुरुषार्थामध्ये अडथळा निर्माण करतात. कमजोर संस्काराच्या अधीन झाल्यामुळे त्या कमजोर संस्काराचे मनामध्ये विचार वारंवार चालल्यामुळे वायुमंडळ दूषित होते. आपली वृत्ती सुद्धा नकारात्मक बनून जाते. कमकुवत व्यक्ती आत्मचिंतन, परमात्म चिंतन करू शकत नाही. असा साधक एकाग्र होऊ शकत नाही. कर्मयोगी बनू शकत नाही. कमजोरीचा वश झाल्यामुळे संकल्प, श्वास आणि वेळ सुद्धा वाया जातो. कमजोरीचे चिंतन मनामध्ये चालल्यामुळे मन आणि बुद्धीची भटकंती सुरू होते. कमजोरच्या चिन्तनामुळे अन्तर्मुखता भंग होते. वर्तमानकाळी कमजोर संस्कार हाच प्रत्येकाच्या पुरुषार्थामध्ये खूप मोठा अडथळा आहे. म्हणूनच बापदादानी आपल्या कमजोरीला समाप्त करा असा इशारा केला आहे.

लक्षात ठेवा जर काय आपण आपल्या दुबळ्या संस्कारांना समाप्त केले नाही तर मग यातून कमजोरी भविष्यामध्ये अंशाचा वंश बनून जाईल. माया प्रवेशाचे गेट बनून आपण पराजीत होऊ. म्हणून या वर्षी बापदादाच्या मदतीने आणि आपल्या दृढ संकल्पाने आपल्यामधील कमजोर संस्कारांना समाप्त करण्याचा पुरुषार्थ करूया. तरच आपण संपूर्ण आणि संपन्न बनू शकेल. कमजोर संस्कार आपल्या जीवनातील एखाद्या छिद्राप्रमाणे लिकेज आहे.

ज्यावेळी आपण स्वत:मधील मुख्य कमजोरी समाप्त करतो तेव्हाच इतर लहान मोठ्या कमजोरी तर आपोआप समाप्त होतील. ज्याप्रमाणे रामायणामध्ये दाखविले जाते श्रीराम रावणाचे एक डोके कापतात तेव्हा ते पुन्हा आपसूक जोडले जाते. दुसरे कापले जाते तेव्हा ते सुद्धा आपोआप जोडले जाते शेवटी श्रीराम थकले तेव्हा बिभीषण तिथे आला आणि त्यांनी सांगितले की, हा असा मरणार नाही. त्याच्या नाभीमधे बाण मारा तेव्हा तो मरेल. जेव्हा श्रीरामांनी रावणाच्या नाभीमधे बाण मारला तेव्हा तो मेला. याचप्रमाणे आपण सुद्धा कोणी २० वर्षापासून, कोणी १५ वर्षांपासून, कोणी १० वर्षांपासून विकाररुपी रावणाचे गळे कापण्याचा पुरुषार्थ करत आहोत. परंतु एक विकार संपला की पुन्हा दूसरा जागृत होतो. देहभान हे या सगळ्या विकाराचे मूळ आहे. देहभानाचे उच्चाटन म्हणजे रावणाचा समूळ नाश.

**आपल्या कमकुवत संस्कारांना ओळखणे गरजेचे आहे**

वयाच्या ६ वर्षापासून ते ज्ञानामध्ये येईपर्यंत आपण कोणत्या कमजोरीच्या वशीभूत पुन्हा पुन्हा झालो ते स्वत:लाच एकांतामध्ये पडताळून पहा. त्यानंतर ज्ञानमार्गामध्ये आल्यानंतर कोणती कमजोरी पुन्हा पुन्हा तुम्हाला आकर्षित करते. आपल्या हातून त्या कमजोरीमुळे चुका होतात ते सुद्धा पडताळून पाहा.

भीष्मपितामहांच्या समोर जेव्हा शिखंडी येतो तेव्हा त्याचे बाण काम करेनासे झाले. त्याचप्रमाणे आपल्यामध्ये जेव्हा कमजोरीचे संस्कार जागृत होतात तेव्हा आपल्यामधील ज्ञान योग बल काम करू शकत नाही. आपल्या हातून चूका होतात. आपल्यामधील कमजोरी हाच आपल्यासाठी शिखंडी आहे. कारण आपण त्या कमजोरीचा जन्मजन्मी उपयोग करून क्षणिक सुख घेण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच ती कमजोरी प्रभू मिलनामध्ये वर्तमानवेळी आपल्या जीवनामध्ये अडथळा निर्माण करते. म्हणूनच या वर्षी त्या कमजोरीला दृढतेद्वारा परिवर्तन करण्याचा पुरुषार्थ करावयाचा आहे.

**कमजोर संस्काराला परिवर्तन करण्यासाठी –**

**१) रोज अमृतवेळेस आपल्या कमजोरीबद्दल बापदादांना सांगणे** – ज्याप्रमाणे डॉक्टर वेगवेगळ्या वार्डमध्ये जाऊन पेशन्टची तपासणी करतो. ज्यावेळी डॉक्टर वार्डमध्ये तपासणी करतो तेव्हा पेशन्ट उठून बसतो आणि आपल्या

तब्येतीबद्दल सर्व काही माहिती डॉक्टरांना सांगतो. त्याप्रमाणे डॉक्टर औषध देत असतो.

त्याचप्रमाणे सारी दुनिया सुद्धा एक इस्पितळ आहे. प्रत्येकाला कोणत्या न कोणत्या विकाराचा आजार आहे म्हणून शिवबाबा सुप्रीम सर्जन रोज अमृतवेळी या विश्वरूपी हॉस्पिटल मध्ये चक्कर मारतात. त्यावेळी आपल्याला रोज अमृतवेळी उठून आपल्या कमजोरीबद्दल सर्व काही सांगावयाचे आहे. पेशन्ट आपल्या आजाराबद्दल डॉक्टरांना माहिती सांगतो तेव्हा माहितीप्रमाणे कम्पाऊंडरजवळ त्याचे औषध मिळते. त्याचप्रमाणे आपण सुद्धा आपल्या कमजोरीबद्दल बापदादांना सांगितले तर मुरलीमधून किंवा एखाद्या भाऊ-बहिणीच्या क्लासमधून आपल्या कमजोरीबद्दल काही ना काही योग्य ज्ञान मिळतील आणि आपण त्या कमजोरीवर विजय प्राप्त करण्यासाठी सहयोग मिळू शकेल. म्हणूनच यावर्षी रोज सकाळी अमृतवेळा आपल्या कमजोरीबद्दलची माहिती बापदादांना सांगून आपण त्या कमजोरीपासून मुक्त बनण्याचा पुरुषार्थ करूया.

**२) वैशिष्ट्ये धारण करा –** प्रत्येकाला कोणती ना काणती वैशिष्ट्ये चांगली वाटतात. परंतु ज्यावेळी आपण आपली वैशिष्ट्ये दुर्लक्ष्य करतो त्या वैशिष्ट्यांद्वारे सुख घेण्यापासून वंचित होतो. याकरिता योगयुक्त राहण्याच्या वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**३) अनुभवी व्यक्तींच्या सहयोगाने –** आपल्यामध्ये जी कमजोरी आहे त्याबद्दल ज्यांना बापदादांनी निमित्त बनविलेले किंवा जे अनुभवी आहेत, महारथी आहेत. त्यांना सांगून त्यांच्याकडून सुद्धा कमजोरी मुक्त बनण्याचा योग्य असा सल्ला घेऊन आपण त्या कमजोरीपासून मुक्त बनू शकतो. परंतु आपल्या मनात कधी कधी शंका येते जर आपण आपली कमजोरी महारथींना किंवा इतर निमित्त अनुभवींना सांगितले तर ते आपल्याला त्याच नजरेने पाहू लागतील म्हणून आपण आपल्या कमजोरी इतरांपासून लपविण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु लक्षात ठेवा जर काय आपण आपल्या कमजोरीला इतरांपासून लपविले तर मग ती कमजोरी वाढत वाढत स्वत: आपणच या ज्ञान मार्गातून लपून जाऊ अर्थात् निघून जाऊ शकेल. यासाठी त्या कमजोरीचा इतरांपासून सल्ला घेऊन इलाज करणे गरजेचे आहे. तरच आपण त्या कमजोरी पासून मुक्त होऊ शकतो.

**४) कमजोरीचे भोजन देऊ नका –** आपल्यामधील कमजोरी वारंवार होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्या कमजोरीला काही ना काही हवा-पाणी मिळत राहते. तेव्हाच ती कमजोरी आपल्या व्यवहारात किंवा संस्कारात उफाळून येत असते. एखाद्याची कमजोरी, अपवित्रता किंवा काम वासना आहे. असा व्यक्ति जर इंटरनेटमधून अश्लिल फोटो, अश्लिल चित्रपट पाहत असेल किंवा अश्लिल साहित्य वाचत असेल, गाणे ऐकत असेल तर मग अशा व्यक्तिंच्या जीवनामध्ये पुन्हा पुन्हा कमजोरी येत राहील. कारण तो त्या कमजोरीला जागृत करणारी सामग्री, हवा पाणी, भोजन देत आहे. अशा व्यक्तिंच्या जीवनामध्ये कमजोरी वारंवार होऊन त्याच्या हातून चूका सुद्धा होऊ शकतील. जर काय आपल्याला त्या कमजोरीपासून मुक्त व्हायचे असेल तर मग त्या कमजोरीचे भोजनापासून दूर रहायचे आहे. वैरागी बनायचे आहे तरच त्या कमजोरी पासून आपण मुक्त बनू शकेल.

**५) अशरीरी, आत्मअभिमानी किंवा बीजरुप स्थितीच्या अभ्यासाद्वारे –** आपल्या कमजोरीला समाप्त करण्यासाठी अशरीरी, आत्मअभिमानी स्थिति किंवा बीजरूप स्थिति एखाद्या ब्रह्मा अशाप्रमाणे कार्य करते. कारण अशा स्थितिमुळे खरे आत्मिक सुख मिळते. त्यामुळे कमजोरीचे क्षणिक सुख फीके वाटू लागते. अशा स्थितिमुळे अतीइन्द्रिय सुख मिळते त्यामुळे कमजोरीपासून आपोआप वैराग्य येते. शरीर रुपी घरामध्ये सुद्धा आत्मिक स्मृतिचा प्रकाश सतत चालू ठेवल्यामुळे कोणत्याही कमजोरी रुपी भूतांचा वास राहणार नाही. म्हणून शिवबाबा रोज मुरलीतून वारंवार सांगतात. मुलांनो तुम्ही आत्मिक स्मृति मध्ये रहा. जिथं देहभान असते तिथं कमजोरी वास करते. यावर्षी कमजोरी पासून मुक्त बनण्यासाठी वारंवार आत्मिक स्मृतिचा करत रहा. तरच कमजोरीपासून आपण मुक्त बनू शकतो.

**६) वाह ड्रामा वाह**

कमजोरी जीवनामध्ये येण्याचे मुख्य कारण म्हणजे मनातील नकारात्मक विचार. मनातील नकारात्मक विचारांमुळे आत्मबळ, मनोबळ कमजोर होते. त्यामुळे आपण कमजोरीच्या अधीन होऊन जातो. यासाठी सारे दिवसभरात कोणतीही अनुकूल परिस्थिती आली तर त्यावेळी नकारात्मक विचार करण्याऐवजी वाह वाह चे गीत गात रहा. ड्रामा कल्याणकारी आहे, विघ्न कल्याणकारी आहे;

परमात्मा कल्याणाकरी आहे संगमयुगाचा काळ सुद्धा कल्याणकारी आहे. परमात्मा सुद्धा कल्याणकारी आहे. त्यामुळे नेहमी वाह वाह चे गीत गात उमंग उत्साहामध्ये राहण्याची गरज आहे.

**७) श्रीमताचे पालन**

श्रीमताचे रोज आपण काटेकोरपणे पालन केल्यामुळे आपली आंतरिक शक्ती वाढते. ज्यावेळी आपण श्रीमताचे उल्लंघन करतो तेव्हा आपण कमजोर बनतो त्यामुळे देहभानामध्ये येतो त्यावेळी कमजोरी आपल्यावरती वार करते. आपल्या रोजच्या दिनचर्या मध्ये दृढ संकल्प घेऊन श्रीमतावर चालण्याचा दृढ निश्चय करावयाचा आहे.

**८) स्वत:ला नेहमी लौकिक–अलौकिक कर्मामध्ये व्यग्र ठेवल्यामुळे** – म्हटले जाते रिकामे मन सैतानाचे घर ज्यावेळी आपण स्वत:ला रिकामे ठेवतो किंवा आपल्या मनाची दिनचर्या बनवत नाही अशावेळी आपल्या मनामध्ये कमजोरी जागृत होण्याची संभावना असते. म्हणूनच कमजोरी पासून मुक्त बनविण्यासाठी या वर्षी रोज रात्री किंवा अमृतवेळेनंतर आपली दिनचर्या स्थूल आणि मनाची बनवून त्याप्रमाणे स्वत:ला व्यग्र ठेवण्याचा पुरुषार्थ करावयाचा आहे.

**९) ज्वालास्वरुप योग तपस्या द्वारे** – ज्याप्रमाणे भाजलेले बीज उगवत नाही त्याचप्रमाणे रोज ज्वालास्वरुप अर्थात पावरफूल योग केला तर आपल्या आत्म्यामध्ये जे कमजोरीचे किरण पसरलेले आहेत त्याचे अंश आणि वंश सुद्धा समाप्त होतील. ज्वालास्वरुप केल्यामुळे कमजोरी आपल्या व्यवहारात, संस्कारापासून समाप्त होईल.

**१०) आपल्या शरीर रुपी किल्ल्याला मजबूत केल्यानंतर** – या वर्षी कमजोरीपासून मुक्त बनण्यासाठी आपल्या शरीर रुपी किल्ल्याला मजबूत करणे गरजेचे आहे. कमजोरी संस्कारामध्ये येणे म्हणजेच आपल्या शरीर रुपी किल्ल्यातील कोणते ना कोणते कर्मइन्द्रिय अनियंत्रित होणे रोज आपला दरबार लावून प्रत्येक कर्मेइन्द्रियाला जर आपण सशक्त बनविले तरच आपण कमजोरी रुपी शत्रूपासून स्वत:चे रक्षण करून त्यापासून मुक्त बनू शकतो. स्वराज्य अधिकारी बनून रोज आपल्या कर्मइन्द्रियाचा दरबार लावण्याचा पुरुषार्थ करावयाचा आहे.

अशा प्रकारे वर्तमान वेळी कमजोरीला समाप्त करण्याचा पुरुषार्थ करणे हे गरजेचे आहे. तरच आपण निर्विघ्न बनू शकतो.

***

---

(पृष्ठ क्र.२१ वरुन)

आपल्यालाही पडत असतील? तर जरूर जरूर या आपल्या ब्र.कु.रीच्या जवळच्या सेंटरवर आपले स्वागत आहे.

**प्रश्न :** मनुष्य धरतीवर सर्वात आधी कधी आला? कोणत्या ठिकाणी नेमका आला? आणि तो एवढा पुढे कशाप्रकारे आला?

**सूरजभाई :** असं बघा, जसे डार्विननी आपला सिद्धांत मांडला, त्यात अमिबा वाढत गेला --- मग मनुष्याची निर्मिती झाली वगैरे नमूद केलं. पण तुम्हाला सांगू प्रत्येक निर्मिती झालेल्या गोष्टीचे पतन होतेच. मनुष्य कधी (पूर्वी) देवता होता. त्या देवत्वापासून त्याचे अध:पतन होतं. तो आत्ता ह्या ठिकाणी आलाय. परंतु या देवताही मनुष्यच होते, परंतु त्यांच्यात दैवी गुण म्हणजेच सद्गुण होते. त्यामुळे त्या मनुष्यांस देवता म्हणायचे. आताही तो मनुष्यच आहे; पण त्यांच्यातील ह्या दैवी गुणांचा आता ऱ्हास होऊन तो दुर्गुणांचा पुतळाच जणू झालाय, परंतु ही सृष्टी मनुष्य विरहीत कधीच नव्हती. ही नेहमी होती, आहे आणि राहील. असं नाही की प्रलय झाला आणि ही सृष्टीच नष्ट झाली. आणि ब्रह्माने पुन्हा नवीन सृष्टी तयार केली. असं म्हटलं तरी मग हा प्रश्न उत्पन्न होईल की, हे ब्रह्मा कुठून आले? तर असं काही होत नाही. मनुष्य सृष्टी सदैव आहे. देवता ते मनुष्य असा त्याचा पूर्ण प्रवास होतो. ह्या सृष्टीत सत्ययुगाची स्थापना आणि कलियुगाचा विनाश तसेच सतयुग, त्रेतायुग, द्वापर, कलियुग–असे सृष्टीचे ४ भागात विभागलेले चक्र कायम फिरत असते–जसे हे दिवस–रात्रीचं चक्र आहे, अगदी तसच.

ह्यात आपण एवढंच म्हणू शकतो. मनुष्याशिवाय सृष्टी नाही, तो नेहमीच येथे आहे. ह्या सृष्टीरुपी रंगमंचावर आपली भूमिका नेहमीच करत आलोय. मग तो देवतेचा असो की, अवगुणी मनुष्याचा. ह्यात अशा प्रकारे हे चक्र (सृष्टी) अनादि असल्याचे दिसून येते. सृष्टीचक्र कधी सुरू झाले. कधी संपणार इत्यादी प्रश्न गौण ठरतात. भारतीय तत्त्वज्ञान ऱ्हासवाद मानते. उत्क्रांतीवाद नाही.

***

(पृष्ठ क्र.२३ वरुन)
टाकला होता ते हिरोशिमा तिथेही ब्रह्माकुमारीजचे कार्यक्रम होत असतात. पाहुणे मंडळी येत असतात. जिथे बॉम्ब पडला होता, त्याच्या आसपास आम्ही ह्यांचे विशेष व्याख्यान ठेवतो. तिथे लोक एकत्र होतात. त्या लोकांनाही राजयोगाबद्दल फार उत्सुकता आहे. आपणही हे शिकावे असे त्यांना वाटते, त्यामुळे तेही खूप सहयोग देतात. त्यांना ह्याची आवड असल्याने शाकाहारी जीवनपद्धतीचा ते सहज अवलंब करतात. जपानी लोक फार गुणी आहेत. ते वचनबद्धता फार पाळतात. कष्टाळू आहेत, प्रामाणिक आहेत. एकदा एखाद्या गोष्टीसाठी वचन दिलं की, मग काहीही होवो, ते मागे-पुढे पाहत नाहीत. शेवटपर्यंत वचनबद्ध राहतात. अशाप्रकारे जपानची सेवा दिवसेंदिवस वाढतच आहे.

**रेश्मिता :** दीदी खूप आभारी आहे तुम्ही जपानमधील सेवेची खूप छान माहीती आम्हाला दिलीत. लोकांना प्रात्याक्षिकाद्वारे हे दाखवून दिलेत की ह्या जगात दृढ निश्चय केला, तर कोणतीही गोष्ट अशक्य नसते.

रजनीदीदींशी मी अनेकदा असे औपचारिक आणि अनौपचारिकपणे संवाद साधत असते. त्यातून मिळणारी माहिति आपल्यासमोर ठेवत जाईन.

***

## 'दान' या शब्दाविषयी थोडंसं विचार मंथन

दान हा शब्द 'दा' या धातूपासून (संस्कृत भाषेतील धातू) बनला आहे. याचे अर्थ, देणे आणि कापणे असे आहेत. आपल्यातले कापून दुसऱ्याला देणे म्हणजे दान. उदा. प्रसादात मिळालेला पेढा दुसऱ्याला देणे म्हणजे दान किंवा समविभाजन. आपल्यातील विकारांचे शिवपित्याला दान करणे हेच संगमयुगातील खरे दान आहे. हे दान जितके प्रभावी तितकी आध्यात्मिक प्रगती श्रेष्ठ हेच खरे.

***

## जगण्या शिकले

बाबा तुझ्या प्रेमाने जगण्या शिकविले
बाबा तुझ्या ज्ञानाने जग हे भुलविले

होतो बुडून गेलो विकारी दुनियेत
दावुनी ज्ञानज्योत केले मज कृतार्थ
योग बलाने सारे जीवन उजळले
बाबा तुझ्या प्रेमाने जगण्यास शिकविले

अवतीभवती सारी माया ही घनदाट
काढले मज बाबा देऊन तुम्ही हात
माया मोहातुनी तुम्हीच मुक्त केले
बाबा तुझ्या प्रेमाने जगण्या शिकविले

निज आत्म्याची दिली खरी ओळख
सत्य गीताज्ञानाने बुद्धी झाली पारस
देऊनी सेवाभाव भाग्यवान बनविले
बाबा तुझ्या प्रेमाने जगण्या शिकविले

येताच ज्ञानसूर्य अज्ञानतम पळाला
पडता पवित्र किरणे अभिमान हा गळाला
योग बलाने सारे विकर्म नष्ट झाले
बाबा तुझ्या प्रेमाने जगण्या शिकविले
तुझ्या ज्ञानाने जग हे भुलविले

**- ब्र.कु. लता, देगलूर**

***



ठाणे (प) : ''मेंटल हेल्थ'' सेमिनार नंतर, अतिरिक्त आयुक्त भ्राता संदीप मालवी यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. रेखा, ब्र.कु. कांचन



जगदंबा भवन, पुणे : महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त ज्योती धोत्रे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सुनंदा




सीबीडी बेलापूर : महाराष्ट्र राज्य नशामुक्ती मंडळातर्फे आयोजित व्यसनमुक्ती कार्यक्रमात उपस्थित ग्रुप फोटोत ब्र.कु. शीला, ब्र.कु. मीरा, भ्राता सुदेश परब, भ्राता मिलिंद पाटील व अन्य



येवला : गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रमात मा. शांताबाई सोनावणे कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यावर ब्र.कु. नीता सोबत अध्यक्ष भ्राता अरूण भांडगे सर, प्राचार्य भ्राता सचिन सोनवणे व अन्य



रविवार पेठ (पुणे) : जागतिक पर्यावरणदिनानिमित्त वृक्षारोपण करताना ब्र.कु. रोहिणी व अन्य



फैजपूर : ''डॉक्टर्स डे'' निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्ज्वलन करताना ब्र.कु. शकुंतला व सर्व डॉक्टर्स



कोपरगाव : ''डॉक्टर्स डे'' निमित्त आयोजित कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत महाराष्ट्र आय.पी.ए. प्रेसिडेंट भ्राता डॉ. रवींद्र कुंटे, भ्राता डॉ. दीपक, ब्र.कु. सरला

Registration No. : MAHMAR/2007/21914



श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सर्व वाचकांना शुभेच्छा!

श्रीकृष्णासमान आपल्याला सर्वगुणसम्पन्न,
सोळा कला संपूर्ण बनायचे आहे याचीच आठवण
करुन देणारा हा सण आहे.